१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 18975 दिनांक : 30/12/2025

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, भडकल गेट जवळ, छत्रपती संभाजीनगर

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ११४० व ११४१/२०२५ (०२)**

श्री.गाडेकर मुंजाराम ज्ञानोबा, अपिलार्थी
रा.कालिका नगर, माजलगाव, ता.माजलगाव, जि.बीड

**विरुध्द**

१ नवविकास मंडळ, माजलगाव, जि.बीड : उत्तरवादी क्र.१

२ नवविकास मंडळ, माजलगाव, जि.बीड : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१८.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. संबंधित संस्थेच्या वतीने कोणीही उपस्थित नाहीत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार संबंधित संस्थेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १५ | १२.११.२०२४ | नवविकास मंडळ माजलगाव या संस्थेची घटना, संचालक मंडळाची यादी व अजीव सभासद यादीच्या साक्षांकित प्रती मिळणेबाबत, |
| १६ | १२.११.२०२४ | नवविकास मंडळ माजलगाव या संस्थेचे संस्था स्थापनेपासुन आजतागायतपर्यंत केलेले लेखापरीक्षण अहवाल तसेच सन २०१० पासुन संस्थेच्या बँक खात्याचा खाते उतारा व संस्था स्थापनेपासुन संस्थेचे घेतलेल्या ठरावांच्या साक्षांकित प्रती मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची गरज असल्यामुळे ती देण्याचे संस्थेस आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी सार्वजनिक विश्वस्त कायदा १९५० नुसार नोंदणी झालेल्या खाजगी संस्थेकडे माहिती अर्ज सादर करुन माहितीची मागणी केलेली आहे. सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांना अशी विचारणा करण्यात आली की, सदर संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष प्राप्त होत असल्याबाबतचा पुरावा आयोगाच्या पटलावर सादर करण्यात यावा. मात्र या संदर्भात कोणताही संयुक्तिक पुरावा अपिलार्थी आयोगाच्या पटलावर सादर करु शकलेले नाहीत. सारांशाने अपिलार्थी यांनी ज्या संस्थेकडे माहितीचा अर्ज सादर करुन माहितीची मागणी केलेली आहे त्या संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष स्वरुपात प्राप्त होत नसल्यामुळे अशा स्वरुपाच्या संस्थेचा माहिती अधिकार

अधिनियम २००५ मधील कलम २ (ज) मधील सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होणार नाही आणि पर्यायाने अशा प्रकारच्या खाजगी संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18929 दिनांक : 30/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ११४२/२०२५
बोर्ड क्र.१७

श्री.गाडेकर मुंजाराम ज्ञानोबा, — अपिलार्थी
रा.कालिका नगर, माजलगाव, ता.माजलगाव, जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१८.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.११.२०२४ | आपल्या कार्यालयामार्फत नवविकास मंडळ माजलगाव अंतर्गत येणाऱ्या जवाहर मा. व उच्च मा.विद्यालय केसापुरी वसाहत आणि महात्मा ज्यो.फुले माध्यमिक विद्यालय माजलगाव या शाळेतुन शिक्षक आणि शिक्षकेत्तर जागेच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आलेले प्रस्ताव व त्यापैकी आपण मंजुरी दिलेले प्रस्ताव व नामंजूर केलेले प्रस्ताव तसेच सदर प्रस्ताव कशामुळे नामंजुर करण्यात आले याबाबतची माहिती तसेच विद्यालयाने केलेला पत्रव्यवहाराच्या प्रती देणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपील अर्जाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी व

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (वेतनातील कपातीचा भाग वगळून), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नसून माहितीचा अर्ज योग्य पध्दतीने हाताळलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१६.१२.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19045 दिनांक : 31/12/2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १६९७/२०२५**
**बोर्ड क्र.१८**

श्री.विशाल वसंतराव सुर्यवंशी,
रा.बनसोडे नगर, अंबाजोगाई रोड, लातुर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, अपिलार्थी यांचे विधीज्ञ ॲड.एम.व्ही.कुलकर्णी व जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (मा), श्री.हजारे एन.जी. उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.०१.२०२५ | १.दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०२४ या कालावधीत भारतीय शिक्षण संस्था अंबाजोगाई संचलित १.स्वा.विर सावरकर माध्यमिक विद्यालय बीड, २. श्री सिध्देश्वर मा.विद्यालय माजलगाव व ३. श्री.खोलेश्वर मा.विद्यालय अंबाजोगाई या तिन्ही विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना दिलेल्या वेतन मान्यता आदेश, २. विनाअनुदानावरुन अनुदानावर करण्यास मान्यता आदेश, ३. संच मान्यता तिन्ही विद्यालयाची, ४. तिन्ही विद्यालयाचा बी.सी. सेलची विभागाची मान्यता प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अगवत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जानुसार

मागणी केलेली माहिती शाळेशी संबंधित असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज शाळेकडे पाठविलेला आहे. अत: अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती शिक्षण विभाग माध्यमिक, जिल्हा परिषद, बीड या कार्यालयाकडे उपलब्ध असणे अपेक्षित आहे. मात्र अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याऐवजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज संबंधित शाळेकडे हस्तांतरित केलेला आहे. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र२।।३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.: 18203 दिनांक : 26/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १६९१८/२०२५**
**बोर्ड क्र.१९**

श्री.विशाल वसंतराव सुर्यवंशी,
रा.बनसोडे नगर, अंबाजोगाई रोड, लातुर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
सिध्देश्वर माध्यमिक विद्यालय, माजलगांव, जि.बीड — उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
सिध्देश्वर माध्यमिक विद्यालय, माजलगाव, जि.बीड — उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.०१.२०२५ | १.दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०२४ या कालावधीतील विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेश प्रती अनुदानावर व विनाअनुदानावर मा.शिक्षणाधिकारी यांच्या वेतन मान्यतेच्या आदेश प्रती, २. दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०२४ पर्यंत विनाअनुदानावरुन अनुदानावर केलेल्या बदल्या आदेश प्रती मा.शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी दिलेल्या वेतन मान्यता आदेश प्रती, ३. संच मान्यता प्रती, ४. बी.सी. सेलची विभागाची मान्यता प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती वैयक्तिक असल्याची सबब पुढे करुन अशी माहिती दि.१७.१०.२०१४ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार देय होत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारी माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली

नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, सिध्देश्वर माध्यमिक विद्यालय, माजलगाव, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याध्यापक, सिध्देश्वर माध्यमिक विद्यालय, माजलगाव, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।१३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18204 दिनांक : 26/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १६९९/२०२५**
**बोर्ड क्र.२०**

श्री.विशाल वसंतराव सुर्यवंशी, — अपिलार्थी
रा.बनसोडे नगर, अंबाजोगाई रोड, लातुर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
स्वा.सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याध्यापक,
स्वा.सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.०१.२०२५ | १.दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०२४ या कालावधीतील विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेश प्रती, अनुदानावर व विनाअनुदानावर मा.शिक्षणाधिकारी यांच्या वेतन मान्यतेच्या आदेश प्रती, २. दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०२४ पर्यंत विनाअनुदानावरुन अनुदानावर केलेल्या बदल्या आदेश प्रती मा.शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी दिलेल्या वेतन मान्यता आदेश प्रती, ३. संच मान्यता प्रती, ४. बी.सी. सेलची विभागाची मान्यता प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती वैयक्तिक असल्याची सबब पुढे करुन अशी माहिती दि.१७.१०.२०१४ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार देय होत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारी माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली

नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, स्वा.सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याध्यापक, स्वा.सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

१५/२/२६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. १८२०५ दिनांक : २६/१२/२०२५

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १७००/२०२५**
**बोर्ड क्र.२१**

श्री.विशाल वसंतराव सुर्यवंशी,
रा.बनसोडे नगर, अंबाजोगाई रोड, लातुर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.०१.२०२५ | १.दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०२४ या कालावधीतील विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेश प्रती अनुदानावर व विनाअनुदानावर मा.शिक्षणाधिकारी यांच्या वेतन मान्यतेच्या आदेश प्रती, २. दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०२४ पर्यंत विनाअनुदानावरुन अनुदानावर केलेल्या बदल्या आदेश प्रती मा.शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी दिलेल्या वेतन मान्यता आदेश प्रती, ३. संच मान्यता प्रती, ४. बी.सी. सेलची विभागाची मान्यता प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या

जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याध्यापक, खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18206 दिनांक : 26/12/2025

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

सत्यमेव जयते

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १७२२/२०२५**
**बोर्ड क्र.२२**

श्री.शेख महंमद अख्तर पिता महंमद सादेक, — अपिलार्थी
रा.आझाद नगर, परळी वैजनाथ, ता.परळी, जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (मा), श्री.हजारे एन.जी. उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०९.२०२४ | १.महेबुबिया शिक्षण संस्था रजि.नं.एफ-१३१ परळी वै. मार्फत चालणारी इमदादुल-उलुम माध्यमिक शाळा येथील सध्या कार्यरत असलेली शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी (त्यात शिक्षक, लिपिक, सेवक इ.) यांची तपशिल आणि त्यांचे पगार पत्रकाची दि.०१.०१.२०२४ पासुन दि.३१.०८.२०२४ पर्यंतची नक्कल व इतर ०५ मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार हवी असलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती शाळेशी संबंधित असल्यामुळे दि.०७.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांचा माहिती अर्ज इमदादुल उलुम माध्यमिक शाळा, परळी वै., ता.परळी वै., जि.बीड या शाळेकडे कलम ६ (३) नुसार वर्ग करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज संबंधित शाळेकडे वर्ग केला असल्याचे दिसुन येत आहे. मात्र अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे कलम ६ (३) नुसार पाच दिवसापेक्षा अधिक विलंबाने हस्तांतरण झाले असल्यामुळे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती आता कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन द्यावी लागेल. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती एका पेक्षा अधिक विषयाशी संबंधित आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील पहिल्या विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र-अ मध्ये नमूद एका विषयावरील माहिती (माहिती अर्जातील पहिल्या विषयाची माहिती म्हणजे सध्या कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची यादी व त्यांना अनुज्ञेय असलेले वेतन (कपातीचा भाग वगळून)) अशी माहिती ज्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे ती त्या कार्यालयाकडुन (इमदादुल उलुम माध्यमिक शाळा) अधिनियमातील कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन अशी माहिती अपिलार्थी यांना, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)
(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18973 दिनांक : 30/12/2025

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
मुख्याध्यापक, इमदादुल उलुम माध्यमिक शाळा, परळी वैजनाथ, जि.बीड

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १८३१ ते १८३३/२०२५ (०३)**

श्री.मुजीबोद्दीन हमीदोद्दीन काझी, — अपिलार्थी
रा.मोहम्मदीया कॉलनी, फुलवाली मस्जीदजवळ, अंबाजोगाई, जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| २३ | २०.०१.२०२५ | फारुकी हायस्कूल शिरसाळा परळी वैजनाथ जि.बीड या शाळेतील मान्यता दिलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक मान्यता बाबतची संपूर्ण मामिहती, |
| २४ | २०.०१.२०२५ | फारुकी हायस्कूल शिरसाळा परळी वैजनाथ या शाळेला शासन निर्णय दि.०६.०२.२०२३ अन्वये टप्पा अनुदान मिळणेबाबत शिक्षण विभाग माध्यमिक जिल्हा परिषद बीड या कार्यालयाने दिलेले टप्पा अनुदान आदेश प्रत संस्थेने / शाळेने टप्पा अनुदान मिळणेबाबत दाखल केलेल्या प्रस्तावातील सर्व कागदपत्राची प्रमाणित प्रत, |
| २५ | २०.०१.२०२५ | फारुकी हायस्कूल शिरसाळा परळी वैजनाथ जि.बीड या शाळेतील मान्यता दिलेल्या शिक्षक कर्मचाऱ्याचे वैयक्तिक मान्यता बाबतची संपूर्ण माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. जन

माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जावर अभिप्रेत असलेली कार्यवाही केली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती कारवाई प्रस्तावित करण्यात यावी व मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२७.०२.२०२५ रोजीच्या तीन प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.** 19043 **दिनांक :** 31/12/2025 **नोंदणीकृत टपालाव्दारे**

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १८३४/२०२५**
**बोर्ड क्र.२६**

श्री.मुजीबोद्दीन हमीदोद्दीन काझी, — अपिलार्थी
रा.मोहम्मदीया कॉलनी, फुलवाली मस्जीदजवळ, अंबाजोगाई,
जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्रा), श्री.जाधव एम.एच. उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०१.२०२५ | फारुकी उर्दू प्राथमिक शाळा शिरसाळा परळी वैजनाथ जि.बीड या शाळेसंदर्भात शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता आदेश प्रत, सत्र २०१२ ते २०२३-२४ पर्यंत संच मान्यता आदेश प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना निर्देशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचा कालावधी मोठा असल्यामुळे अशी माहिती एकत्रित / संकलित करण्यास काही कालावधी लागलेला आहे. तथापि अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती एकत्रित / संकलित करुन अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरिता सोबत आणलेली आहे. सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती एकत्रित करुन ती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदर माहिती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18922 दिनांक : 30/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २७९२ ते २७९६/२०२५ (०५)**

श्री.तांबे नितीन मधुकरराव,
रा.तांबाराजुरी, ता.पाटोदा, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०१.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये पाच द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), श्री.हजारे एन.जी. उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या पाच जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| २७ | २३.०९.२०२४ | माजी विद्यार्थी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित (नो.क्र.एफ-५९०) माध्यमिक विद्यालय तांबाराजुरी या शाळेत श्री.राऊत जयदीप दत्तात्रय या कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यासाठी मुख्याध्यापक यांनी शिक्षणाधिकारी कार्यालयात सादर केलेल्या वैयक्तिक मान्यता प्रस्तावातील कागदपत्रांचे अवलोकन करुन कार्यालयातील प्रत्येक कार्यासनाने व वरिष्ठांनी केलेल्या टिपणी नोंदी कागदपत्रांच्या सर्व पानांच्या झेरॉक्स प्रती, |
| २८ | २५.०९.२०२४ | दि.०१.०६.२०२१ ते दि.२५.०९.२०२४ या नमूद कालावधीतील शिक्षणाधिकारी कार्यालय माध्यमिक जि.प.बीड या कार्यालयाच्या आवक नोंदवही रजिस्टर व जावक नोंदवही रजिस्टर अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी व चिन्हांकित केलेली माहिती देण्यात यावी, |
| २९ | ०७.१०.२०२४ | विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयाचे पत्र जा.क्र.२०२४/विशा/आस्था/संकीर्ण/कावि-१७२३ दि.१९.०९.२०२४ अन्वये मा.शिक्षणाधिकारी माध्यमिक यांना दिलेल्या विषयांकित व संदर्भीय स्मरणपत्रानुसार शिक्षणाधिकारी माध्यमिक शिक्षण विभाग यांनी नियमानुसार सदरील प्रकरणी |

| | | |
|---|---|---|
| | | केलेल्या कारवाई व आदेशाचे कागदपत्रे तसेच विभागीय आयुक्त कार्यालयास सादर केलेल्या कारवाई अहवालाच्या सर्व पानांच्या प्रती, |
| ३० | २४.०९.२०२४ | माजी विद्यार्थी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित (नो.क्र.एफ-५९०) माध्यमिक विद्यालय तांबाराजुरी ता.पाटोदा, जि.बीड या शाळेच्या मुख्याध्यापकाने जा.क्र. माविउमाविता/१२१/२०१५-१६, दि.१८.०४.२०१६ च्या पत्रान्वये शिक्षणाधिकारी माध्यमिक या कार्यालयास दाखल केलेल्या प्रस्तावातील कागदपत्रांचे अवलोकन करुन कार्यालयातील प्रत्येक कार्यासनाने व वरिष्ठांनी सदरील प्रस्ताव फाईलनुसार केलेल्या टिपणी नोंदी कागदपत्रांच्या सर्व पानांच्या झेरॉक्स प्रती, |
| ३१ | ०९.१०.२०२४ | माजी विद्यार्थी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित (नो.क्र.एफ-५९०) माध्यमिक विद्यालय तांबाराजुरी या शाळेत गाढवे नानासाहेब वसंत या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी मुख्याध्यापक यांनी शिक्षणाधिकारी कार्यालयात सादर केलेल्या वैयक्तिक मान्यता प्रस्तावातील कागदपत्राचे अवलोकन करुन कार्यालयातील प्रत्येक कार्यासनाने व वरिष्ठांनी वेळोवेळी सदरील कर्मचाऱ्याच्या या प्रस्ताव फाईलनुसार केलेल्या टिपणी नोंदी कागदपत्राच्या सर्व पानांच्या झेरॉक्स प्रती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या पाचही माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप लक्षात घेता अशी माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद पाचही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह पाच व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18971 दिनांक : 30/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१.

**द्वितीय अपील क्रमांक ३२७५ व ३२७९/२०२५ (०२)**
**बोर्ड क्र.३२ व ३४**

इंजि.सादीक बाबुमियॉ इनामदार,
रा.तेलगाव रोड, एसबीआय बँकेजवळ, धारुर, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
शिक्षण विभाग माध्यमिक, जिल्हा परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१८.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ३२ | ०२.०५.२०२५ | सन २०२२ ते दि.३०.०४.२०२५ पर्यंत माध्यमिक शिक्षण विभाग जि.प.बीड कार्यालयातंर्गत ज्या शिक्षण संस्थेमध्ये ज्या शिक्षकांचे शालार्थ आय.डी. काढण्यात आले त्या शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता व कायम मान्यता संचिकेसोबत जोडलेली शिक्षक भरतीची वर्तमानपत्रातील जाहिरातीची प्रत व संबंधित शिक्षकांच्या हजेरी पटाच्या सत्यप्रती, |
| ३३ | २४.०४.२०२५ | बीड शिक्षण विभाग (मा) जिल्हा परिषद, बीड येथे श्री.नागनाथ शिंदे हे रुजू झाल्यापासुन बीड जिल्ह्यातील खाजगी शिक्षण संस्था व अल्पसंख्याक शिक्षण संस्था अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे नियुक्ती आदेश व कायम मान्यता आदेशाची सत्यप्रती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय

पारित केलेला नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात कार्यवाही केली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द आवश्यक ती कारवाई करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग माध्यमिक, जिल्हा परिषद, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद दोनही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग माध्यमिक, जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिश:** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०२.०६.२०२५ व दि.२७.०५.२०२५ रोजीच्या दोन प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. १९०५२ दिनांक : 31/12/2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३२७७/२०२५**
**बोर्ड क्र.३३**

इंजि.सादीक बाबुमियॉं इनामदार,
रा.तेलगाव रोड, एसबीआय बँकेजवळ, धारुर, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
मिल्लीया हायस्कूल, धारुर, जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१८.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०२.०५.२०२५ | सन २०२२ ते दि.३०.०४.२०२५ पर्यंत कार्यालयाकडे सादर केलेले शालार्थ आय.डी.चे आदेश व थकीत वेतन वितरित करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची यादी व शाळेतील शिक्षकांचे थकीत वेतन वितरित केलेले आहेत त्या वितरण आदेशाची प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. वास्तविक माहितीचा अर्ज भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक माध्यमिक शिक्षण, जि.प., बीड या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सदर माहिती या विभागाकडे उपलब्ध असुन सदर माहिती जिल्हा परिषदेच्या या विभागाकडुन अपेक्षित आहे. जन माहिती अधिकारी तथा वेतन अधीक्षक (माध्यमिक), भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक, बीड यांनी कोणताही सारासार विचार न करता माहितीचा अर्ज मिल्लीया हायस्कूल, धारुर, जि.बीड या शाळेकडे पाठविलेला आहे. माहिती अर्जामध्ये बीड जिल्ह्याशी संबंधित माहितीची मागणी केलेली आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांनी चुकीच्या पध्दतीने अर्ज मिल्लीया हायस्कूलकडे पाठविलेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात योग्य कार्यवाही केली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द आवश्यक ती कारवाई करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मिल्लीया हायस्कूल, धारुर, जि.बीड यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी दिलेले पत्र दिशाभूल करणारे आहे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांचा माहितीचा

मूळ अर्ज वेतन अधीक्षक (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड या कार्यालयाकडे सादर केला असुन अपिलार्थी यांना याच कार्यालयाकडुन माहिती अपेक्षित आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती वेतन अधीक्षक (माध्यमिक) यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे अपेक्षित आहे. मात्र जन माहिती अधिकारी तथा वेतन अधीक्षक (माध्यमिक), भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक, बीड यांनी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज संबंधित शाळेकडे वर्ग केला असल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीदरम्यान अवगत केलेले आहे. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा वेतन अधीक्षक (माध्यमिक), भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक, बीड यांनी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज योग्य प्रकारे हाताळलेला नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत नाही. त्यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेतली असती तर सुनावणीदरम्यान अपिलार्थीस हव्या असलेल्या माहितीचा नेमका ऊहापोह सुनावणीदरम्यान झाला असता. अभिलेखावरुन दिसुन येते की, या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वेतन अधीक्षक (माध्यमिक), भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक, जिल्हा परिषद, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (वेतनातील कपातीचा भाग वगळून), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वेतन अधीक्षक (माध्यमिक), भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक, जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत हाताळलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिश:** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०२.०६.२०२५ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(सही)

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.** 19041 **दिनांक :-** 31/12/2025 **नोंदणीकृत टपालाव्दारे**

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड
२. जन माहिती अधिकारी तथा वेतन अधीक्षक (माध्यमिक), भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक, जिल्हा परिषद, बीड

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३२७६/२०२५
बोर्ड क्र.३५

इंजि.सादीक बाबुमियॉ इनामदार, — अपिलार्थी
रा.तेलगाव रोड, एसबीआय बँकेजवळ, धारुर, जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्याध्यापक,
मिल्लीया प्राथमिक विद्यालय, धारुर, जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१८.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०२.०५.२०२५ | सन २०२२ ते दि.३०.०४.२०२५ पर्यंत कार्यालयाकडे सादर केलेले शालार्थ आय.डी.चे आदेश व थकीत वेतन वितरित करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची यादी व शाळेतील शिक्षकांचे थकीत वेतन वितरित केलेले आहेत त्या वितरण आदेशाची प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. वास्तविक माहितीचा अर्ज भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक प्राथमिक शिक्षण, जि.प., बीड या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सदर माहिती या विभागाकडे उपलब्ध असुन सदर माहिती जिल्हा परिषदेच्या या विभागाकडुन अपेक्षित आहे. जन माहिती अधिकारी तथा वेतन अधीक्षक (प्राथमिक), भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक, बीड यांनी कोणताही सारासार विचार न करता माहितीचा अर्ज मिल्लीया प्राथमिक विद्यालय, धारुर, जि.बीड या शाळेकडे पाठविलेला आहे. माहिती अर्जामध्ये बीड जिल्ह्याशी संबंधित माहितीची मागणी केलेली आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांनी चुकीच्या पध्दतीने अर्ज मिल्लीया प्राथमिक शाळेकडे पाठविलेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात योग्य कार्यवाही केली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द आवश्यक ती कारवाई करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मिल्लीया प्राथमिक शाळा, धारुर, जि.बीड यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी दिलेले पत्र दिशाभूल करणारे आहे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांचा माहितीचा

मूळ अर्ज वेतन अधीक्षक (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड या कार्यालयाकडे सादर केला असुन अपिलार्थी यांना याच कार्यालयाकडुन माहिती अपेक्षित आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती वेतन अधीक्षक (प्राथमिक) यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे अपेक्षित आहे. मात्र जन माहिती अधिकारी तथा वेतन अधीक्षक (प्राथमिक), भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक, बीड यांनी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज संबंधित शाळेकडे वर्ग केला असल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीदरम्यान अवगत केलेले आहे. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा वेतन अधीक्षक (प्राथमिक), भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक, बीड यांनी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज योग्य प्रकारे हाताळलेला नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत नाही. त्यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेतली असती तर सुनावणीदरम्यान अपिलार्थीस हव्या असलेल्या माहितीचा नेमका ऊहापोह सुनावणीदरम्यान झाला असता. अभिलेखावरुन दिसुन येते की, या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वेतन अधीक्षक (प्राथमिक), भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक, जिल्हा परिषद, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (वेतनातील कपातीचा भाग वगळून), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वेतन अधीक्षक (प्राथमिक), भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक, जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत हाताळलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०२.०६.२०२५ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.** १९०५० **दिनांक :** ३१/१२/२०२५ **नोंदणीकृत टपालाव्दारे**

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड
२. जन माहिती अधिकारी तथा वेतन अधीक्षक (प्राथमिक), भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक, जिल्हा परिषद, बीड

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३२७८/२०२५**
**बोर्ड क्र.३६**

इंजि.सादीक बाबुमियाँ इनामदार, — अपिलार्थी
रा.तेलगाव रोड, एसबीआय बँकेजवळ, धारुर, जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — :उत्तरवादी क्र.१
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१८.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), श्री.जाधव एम.एच. उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०४.२०२५ | बीड शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद बीड येथे श्री.भगवान फुलारी हे रुजू झाल्यापासुन बीड जिल्ह्यातील खाजगी शिक्षण संस्था व अल्पसंख्याक शिक्षण संस्था अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे नियुक्ती आदेश, कायम मान्यता आदेशाची सत्यप्रती व बीड जिल्ह्यातील ज्या शाळामधील कायम विना अनुदानित / अंशत: अनुदानित वरुन १०० % अनुदान पदावर नियुक्ती दिलेल्या आदेशाच्या सत्यप्रती व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्राची सत्यप्रतीत माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारलेली आहे. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे अशी माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन

दिली नसल्याचे समजते. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध असुन याबाबत आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18989 दिनांक : 30/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २०७९/२०२५
बोर्ड क्र.३७

श्री.मगर विश्वनाथ भाऊराव,
रा.विश्व कमल निवास, शाहुनगर, पांगरी रोड, बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड — उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२१.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्रा), श्री.जाधव एम.एच. उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०७.०३.२०२५ | अर्जदाराने मु.का.अ. जि.प.बीड यांचेकडे दि.२३.०१.२०२५ (दि.२४.०१.२०२५) रोजी दिलेल्या तक्रारी अर्जावर खात्याने केलेल्या कार्यवाहीबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती माहिती अर्जातील मागणीप्रमाणे मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास नकार दिलेला आहे. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थपक्षाच्या वतीने तक्रार अर्ज सादर या तक्रार अर्जावरील कार्यवाहीची माहिती प्रस्तुत प्रकरणातील माहिती अर्जाव्दारे मागितलेली आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्यामुळे सदर माहिती शासन परिपत्रक दि.१७.१०.२०१४ नुसार देय होणार नाही, असे अपिलार्थीस दि.०२.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२१.०५.२०२५ रोजी सुनावणी घेतलेली आहे. प्रथम अपिलीय

अधिकारी यांनी त्यांच्या दि.२३.०६.२०२५ रोजीच्या पत्राव्दारे, जन माहिती अधिकारी यांचा दि.०२.०४.२०२५ रोजीचा प्रतिसाद / निर्णय कायम करण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान झालेल्या युक्तिवादावरुन असे दिसुन येत आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत केली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. १८७८८ दिनांक : ३०/१२/२०२५

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४४५८/२०२५
बोर्ड क्र.३८

श्री.एकनाथ शंकरराव बांगर,
रा.तलवाडा, ता.गेवराई, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
शिक्षण विभाग प्राथमिक, जिल्हा परिषद, बीड — उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२९.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व अपिलार्थी यांचे विधीज्ञ, ॲड. व्यंकटेश मुंढे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०४.२०२५ | आपले पत्र दि.३१.०३.२०२५ रोजीचे समग्र शिक्षा जि.प.बीड अंशकालीन निदेशक मानधन रुजू दिनांकापासुन शाळा व्यवस्थापन समितीने नियुक्त केलेले ५१ अंशकालीन निदेशकांना दि.१४.१०.२०२४ रोजी रुजू दिनांकापासुन ते मार्च २०२५ या कालावधीचे मानधन दिलेले ५१ अंशकालीन निदेशकांची संपूर्ण नावासह साक्षांकित प्रतीची यादी व नियुक्ती दिलेल्या पत्त्यासह माहितीची यादी मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपील अर्जाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी माहिती

मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग प्राथमिक, जिल्हा परिषद, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिश:** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.३०.०६.२०२५ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 19039 दिनांक : 31/12/2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४८४३/२०२५**
**बोर्ड क्र.३९**

श्री.ब्रिजमोहन धिरजप्रसाद मिश्रा, अपिलार्थी
रा.पेठ गल्ली देशमुख पार जवळ, परळी वैजनाथ, जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
अधीक्षक,
वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, शिक्षण विभाग (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०६.२०२५ | आपल्या कार्यालयाने ०२ मे २०१२ ते ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत जेवढे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मागील दिनांकापासुन बॅकडेटेड वेतन काढलेल्या कर्मचाऱ्यांचे नाव, शाळेचे नाव, मागील दिनांकापासुन काढलेले एकुण वेतन व वैयक्तिक मान्यतेच्या सत्यप्रती, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी चुकीचे कारण देऊन माहिती देण्याचे टाळले, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात दि.१५.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती नाकारुन माहिती अर्ज फेटाळण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाची वैयक्तिक स्वरुपाची असल्याचे दिसुन येत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अशी माहिती अपिलार्थीस

अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, शिक्षण विभाग प्राथमिक, जिल्हा परिषद, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 18982 दिनांक : 30/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४९१६/२०२५
बोर्ड क्र.४०

श्री.धन्वे नागसेन श्रीरंग,
रा.भिमनगर, श्रेया डिपार्टमेंट, बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.३०.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), श्री.जाधव एम.एच. उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०७.२०२५ | १. दि.०९.१०.२०२३ रोजी जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी (विस्तार अधिकारी शिक्षण वर्ग-३ श्रेणी-२) यांची प्रसिध्द केलेली यादी रद्द का केली त्याची माहिती व त्या संचिकेची टिपणीसह प्रत,<br>२. जुलै २०२५ जेष्ठ विस्तार अधिकारी (शिक्षण) पदोन्नतीसाठी तयार केलेली संचिकेची प्रत टिपणीसह,<br>३. सन २०२० पासुन २०२५ पर्यंत ज्या केंद्र प्रमुखांना पदोन्नत्या दिल्या त्यांची नावे व बैठकीचे प्रोसेडिंग, जानेवारी २०२० ते मार्च २०२५ पर्यंत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने

दि.१९.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, पदोन्नतीसाठी प्राथमिक स्वरुपाची यादी प्रसिध्द करण्यात आली होती, त्यावर सदरची यादी दि.१० जुन २०१४ च्या अधिसूचना प्रमाणे करण्याबाबत आलेल्या आक्षेपामुळे पुढे कार्यवाही झालेली नसुन एक वर्षानंतर कार्यवाही न झाल्यास ती यादी निरस्त होते, असे अपिलार्थीस कळवून माहिती अर्ज निकाली काढण्यात आलेला आहे. अत: अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागितलेली माहिती न देणे, दिलेले पत्र चुकीचे, न विचारलेली माहिती देणे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18986 दिनांक :- 30/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५१४६ व ५१४७/२०२५ (०२)**

श्री.रुद्र रमेश महादेव, — अपिलार्थी
रा.पहाडी पारगाव, ता.धारुर, जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ४१ | ०६.०८.२०२५ | जिल्हा परिषद बीड अंतर्गत जिल्हा परिषद शिक्षक यांच्या मासिक वेतना संबंधी माहिती मिळणेबाबत, दि.०१.०४.२०२२ ते दि.०६.०८.२०२५, ०२ मुद्यांवर, |
| ४२ | ०६.०८.२०२५ | जिल्हा परिषद बीड अंतर्गत जिल्हा परिषद शिक्षकांच्या सेवा संबंधित वरिष्ठ वेतन श्रेणीची माहिती मिळणेबाबत, दि.०१.०४.२०२० ते दि.०६.०८.२०२५, ०२ मुद्यांवर, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती माहिती अर्जातील मागणीप्रमाणे मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अनुक्रमे दि.२३.०९.२०२५ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.१०.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, पंधरा दिवसात व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या

निर्णयास अनुसरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्देशित केल्याप्रमाणे दि.२७.१०.२०२५ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थीस व्यक्तिश: माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असुन अपिलार्थी यांनी व्यक्तिश: माहिती स्विकारुन पोच दिलेली आहे. अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जासंदर्भात उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती कार्यालयात उपलब्ध नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूर्ण माहिती, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 18985 दिनांक : 30/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४७०/२०२५**
**बोर्ड क्र.४३**

श्री.अक्षय राजेश उर्फ राजाभाऊ कोकाटे,
रा.बलभीम नगर, पेठ, बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
बांधकाम विभाग, पंचायत समिती, बीड — उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, बीड — उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०८.२०२४ | बीड तालुक्यातील जि.प. समाजकल्याण विभागातंर्गत सन २०२२ ते २०२४ या कालावधीमध्ये दलित वस्ती व अल्पसंख्याक वस्तीमध्ये केलेल्या कामाचे एमबी, इस्टीमेट, सदर कामे कोणत्या व्यक्तीने किंवा कंपनीने केले त्या बद्दल माहिती मिळणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही माहिती देण्यात आलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे व जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अर्जावर गांभिर्याने कार्यवाही केली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या

माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, बांधकाम विभाग, पंचायत समिती, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, बांधकाम विभाग, पंचायत समिती, बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19038 दिनांक : 31/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४७१/२०२५
बोर्ड क्र.४४

श्री.अक्षय राजेश उर्फ राजाभाऊ कोकाटे,
रा.बलभीम नगर, पेठ, बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.३०.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री.ओंकार विलास लोके उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०८.२०२४ | बीड तालुक्यातील जि.प. अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभागात सन २०२१ ते २०२४ या कालावधीमध्ये सोलारपंप, बोरवेल या कामाची एमबी व इस्टीमेट आणि टि.एस.च्या प्रती मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती माहिती अर्जातील मागणीप्रमाणे मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती दि.०७.११.२०२४ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी व्यक्तिश: माहिती स्विकारुन पोच दिलेली आहे. अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जासंदर्भात उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती कार्यालयात उपलब्ध नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, परिपूर्ण माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18984 दिनांक : 30/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५२३, ५२४, ५२५ व ५२७/२०२५ (०४)**

श्री.सुनिल चंद्रसेन जाधव,
रा.पिंपळनेर, ता.जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, पिंपळनेर, ता.जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३१.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये चार द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.घुमरे बाबासाहेब डिगांबर उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या चार जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ४५ | २१.०६.२०२४ | १४ वा वित्त आयोग व १५ वा वित्त आयोग अंतर्गत निधीची माहिती, |
| ४६ | २१.०६.२०२४ | नमुना नं.०१ व ०३ प्रमाणे माहिती, |
| ४७ | २१.०६.२०२४ | उत्पन्नातील १५ टक्के भाग मागासवर्गीय यांच्या उन्नतीसाठी खर्च करणे विषयी माहिती, |
| ४८ | २१.०६.२०२४ | सन २०२२ ते आजपर्यंत ग्रामपंचायत पिंपळनेर, ता.जि.बीड ग्रामसभेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती माहिती अर्जातील मागणीप्रमाणे मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी चार माहिती अर्ज सादर माहितीची मागणी केलेली आहे. माहिती अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे अशी माहिती एकत्रित / संकलित करण्यास काही कालावधी लागलेला आहे. सदर एकत्रित / संकलित केलेली सर्व माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता आज रोजी सोवत आणलेली आहे.

सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदर माहिती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

उपरोक्त चार व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18991 दिनांक : 30/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५२६/२०२५**
**बोर्ड क्र.४९**

श्री.योगीराज बुवासाहेब नरवडे,
रा.पिंपळनेर, ता.जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, पिंपळनेर, ता.जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३१.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.घुमरे बी.डी. उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २१.०६.२०२४ | ग्रा.पं. कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिका व त्यातील नोंदी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असुन या माहितीमध्ये कोणतेही जनहित नाही. या परिस्थितीत अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. त्रयस्थपक्षाशी

संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. या प्रकरणी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रगट केल्यास नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते, याबाबत सुनावणीदरम्यान अपिलार्थीस विचारणा केली असता, याबाबत अपिलार्थी कोणतेही समर्थनीय कारण आयोगास देऊ शकलेले नाही. सारांशाने अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित दिसुन येत नसल्यामुळे अशी माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) नुसार देय होणार नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18970 दिनांक : 30/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक १५५३/२०२५**
**बोर्ड क्र.५०**

श्री.संजय आण्णासाहेब आठवले,
रा.कुक्कडगावा, पो.पिंपळनेर, ता.जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, कुक्कडगाव, ता.जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.के.ए.राऊत उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ~~१९.०६.२०२४~~ 01.08. | १. दि.०१.०१.२०२३ ते आजपर्यंत १५ वा वित्त आयोगातंर्गत विविध शासकीय योजनेवर खर्च झालेल्या रकमेचे विवरण बँक खाते तपशिलासह रोकड नोंदवहीच्या प्रमाणित प्रती,<br>२. रस्ते सुधार योजना, दलित वस्ती योजना व इतर सार्वजनिक योजनेतंर्गत खर्च झालेल्या निविदा प्रतीसह अभिलेख, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता काही कालावधी लागलेला आहे. तथापि सदर एकत्रित / संकलित केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता

आज रोजी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदर माहिती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18983 दिनांक : 30/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २३३२ व २३३३/२०२५ (०२)**
**बोर्ड क्र.५१ व ५२**

श्री.मुकेश विठ्ठलराव रसाळ,
रा.मांजरसुंबा, ता.जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, मांजरसुंबा, ता.जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१३.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.जे.एम.कडू उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ५१ | २४.०२.२०२५ | मांजुरसुंबा ग्रामपंचायतमधील दिव्यांगसाठी आरक्षित ५ टक्के निधीची माहिती, |
| ५२ | २४.०२.२०२५ | १५ वा वित्त आयोग ग्रामस्तरावरील विविध समित्या ग्रामपंचायत क्षेत्रात राबविलेल्या विविध विकास कामे, मासिक सभा व ग्रामपंचायत प्रोसेडिंग ठराव ग्रामपंचायतने वसुल केलेल्या करातुन व उत्पन्नातुन व वर्षाकाठी जमा होणारा ग्रामनिधी, एमआरईजीएस अंतर्गत झालेल्या व चालू असलेले कामे, जानेवारी २०२२ ते फेब्रुवारी २०२५, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे माहिती अर्ज निदर्शनास आणुन दिले नसल्यामुळे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य झालेले नाही. प्रस्तुत प्रकरणाच्या आयोगाकडील सुनावणी नोटीससोबत अपिलार्थी यांचे माहिती अर्ज कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. सदर अर्जांच्या अनुषंगाने अपिलार्थीस आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात

येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलांवर दि.२४.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मांजरसुंबा, ता.जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद दोन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मांजरसुंबा, ता.जि.बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 19037 दिनांक : 31/12/2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३५५४/२०२५**
**बोर्ड क्र.५३**

श्रीमती दिपाली शिवदास सांगळे,
रा.धावज्याचीवाडी, पो.चाकरवाडी, ता.जि.बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, धावज्याचीवाडी, ता.जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.भोसले दशरथ गोविंदराव, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.येळंबकर व्ही.बी., विस्तार अधिकारी (प) उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.०१.२०२५ | मौजे धावज्याचीवाडी ग्रा.पं. अंतर्गत सन २०१६ ते २०२४ पर्यंत, २५१५ तसेच १४, १५ व्या वित्त आयोगातुन झालेले सर्व कामाचा उपलब्ध निधी व त्यांना केलेला वापर याची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे ती एकत्रित / संकलित करण्याकरिता काही कालावधी लागलेला आहे. अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती एकत्रित / संकलित करुन अशी संपूर्ण माहिती दि.०७.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी दि.०९.१२.२०२५ रोजी व्यक्तिश: स्विकारुन पोच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न

दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18982 दिनांक : 30/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३६४५/२०२५
बोर्ड क्र.५४

श्रीमती सय्यद रहिमा सय्यद नियामतुल्लाह,
रा.आहेमदीया मस्जिद जवळ, इस्लामपुरा, बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, वडगाव गुंधा, ता.जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.आर.एस.घाडगे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०३.२०२५ | मौजे वडगांव गुंधा ग्रा.पं. कार्यालय ता.जि.बीड येथील ग्रा.पं. कार्यालयामार्फत म.न.रे.गा. कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या कामाचे पंचायत समिती कार्यालयाला सादर केलेल्या अहवालाच्या कागदपत्राच्या संचिकाची प्रत मिळणेबाबत, दि.०१.०१.२०२३ ते आजपर्यंत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांचा माहितीचा जन माहिती अधिकारी म्हणून निदर्शनास आला नसल्यामुळे या अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य झालेले नाही. अत: आयोगाकडील सुनावणी नोटीस सोबत अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज कार्यालयास प्राप्त झालेला आहे. या अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मोघम स्वरुपाचे खोटे पत्र दिले, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्यांचा मूळ

माहितीचा अर्ज पंचायत समिती कार्यालय, बीड येथे सादर केलेला आहे. जन माहिती अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि.०७.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सरपंच / ग्रामपंचायत अधिकारी, रोजगार सेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वडगाव गुंधा, ता.जि.बीड यांच्याकडे ६ (३) नुसार वर्ग केलेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित असल्यास अशा माहितीकरिता अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज कलम ६ (३) नुसार जास्तीत जास्त पाच दिवसाच्या मुदतीत माहितीशी संबंधित कार्यालयाकडे वर्ग करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे कलम ६ (३) नुसार विहित मुदतीत हस्तांतरण झाले नसल्यामुळे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आता अधिनियमातील कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन द्यावी लागेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली माहिती ज्या कार्यालयाशी संबंधित आहे ती त्या कार्यालयाकडुन (ग्रामपंचायत कार्यालय, वडगाव गुंधा) अधिनियमातील कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन अशी माहिती अपिलार्थीस, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 18981 दिनांक : 30/12/2025

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,

१. जन माहिती अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड
२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४३८४/२०२५
बोर्ड क्र.५५

श्री.श्रीराम तुकाराम नाईक,
रा.चौसाळा, ता.जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी,
गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२३.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०७.२०२५ | १. WP/10077 प्रकाश नामदेव राठोड यांची याचिकेमधील M.PS.P च्या यादीमधुन नियुक्ती झाली आहे का, यांचे मानधन M.PS.P च्या WP/10077 औरंगाबाद खंडपीठ यांच्या साठी आपल्या जिल्ह्यात मानधन कोणत्या यादीनुसार अदा केले आहे हे कळवावे,,<br>2. अंशकालीन निदेशकांचे माहे एप्रिल 2024 ते माहे मार्च 2025 ज्या निदेशकांना मानधन मिळाले आहे त्यांची यादी द्यावे,<br>3. मी श्रीराम तुकाराम नाईक WP/8786 आपल्याकडे M.PS.P च्या आलेल्या यादीमधुन असताना मला कार्यमुक्त कोणत्या पत्र व मुद्यानुसार कार्यमुक्त करण्यात आले हे कळवावे, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. तथापि जन माहिती अधिकारी यांनी आज रोजीच्या

सुनावणीच्या अनुषंगाने त्यांचे दि.०९.१२.२०२५ रोजीचे लेखी निवेदन अनुषंगिक कागदपत्रासह सादर केलेले आहे. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.१९.०९.२०२५ रोजीच्या पत्रासोबत माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती प्राप्त झाली असल्याचे दिसुन येत नाही. सबब, वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली आयोगाचे आदेश प्राप्त तीस दिवसाच्या आत, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार पुन:श्च विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, या निष्कर्षाप्रत येऊन विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत:, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18980 दिनांक :- 30/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४४०९ व ४४१०/२०२५ (०२)**
**बोर्ड क्र.५६ व ५७**

श्री.आकाश भगवान देवकते,
रा.ढेकणमोहा, ता.जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, ढेकणमोहा, ता.जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.बी.जी.तांदळे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.येळंबकर व्ही.बी. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ५६ | ०४.०४.२०२५ | विद्यमान सरपंच यांनी पदभार स्विकारल्यापासुन ते आजपर्यंत किती एकुण ग्रामसभा व मासिक सभा झाल्या आहेत, त्याची प्रोसेडिंग व ठरावाच्या प्रती तसेच त्या बाबतचे जिओटॅगचे फोटोग्राफ व व्हिडीओ शुटींग याबाबत एकुण पाच मुद्यांवर माहिती, |
| ५७ | ०४.०४.२०२५ | विद्यमान सरपंच यांनी पदभार स्विकारल्यापासुन ते आजपर्यंत किती एकुण ग्रामसभा व मासिक सभा झाल्या आहेत, त्याची प्रोसेडिंग व ठरावाच्या प्रती तसेच त्या बाबतचे जिओटॅगचे फोटोग्राफ व व्हिडीओ शुटींग याबाबत एकुण पाच मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.३०.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी दोन माहितीचे अर्ज सादर केलेले असुन दोनही अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती एकसारखीच आहे. अपिलाथी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे कार्यालयात उपस्थित राहुन अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना दि.०२.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सुचित करण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी सदर पत्रानुसार कार्यवाही करुन माहिती प्राप्त करुन घेण्याऐवजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना निर्देशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन, दि.१४.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, दि.१७.०७.२०२५ रोजी कार्यालयात उपस्थित राहुन अवलोकन करण्याचे व आवश्यक माहिती चिन्हांकित करणेबाबत अपिलार्थी यांना सूचित करण्यात आलेले आहे. त्यानुसार अपिलार्थी यांनी दि.१७.०७.२०२५ रोजी उपस्थित राहुन माहितीचे अवलोकन केले असुन तशी पोच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देत नाहीत, चुकीची माहिती व उडवाउडवीची उत्तरे देतात, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्यांचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन अपिलार्थीस दि.१७.०७.२०२५ रोजी माहितीचे अवलोकन दिले असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18929 दिनांक : 30/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४७१५/२०२५
बोर्ड क्र.५८

श्रीमती बालिका महादेव ढास,
रा.मुळूकवाडी, ता.जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, मुळूकवाडी, ता.जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, श्री.महादेव गोकुळ ढास, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.इंगोले सुधीर प्रभाकर, प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.येळबेकर व्ही.बी. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०१.२०२५ | मुळूकवाडी ग्रा.पं. अंतर्गत विविध योजनेतुन झालेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तिका, वर्क ऑर्डर, प्रशासकीय मान्यता, कार्यारंभ आदेश इ.ची प्रत मिळणे, दि.०१.०१.२०२३ ते आजपर्यंत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१३.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे १५ दिवसात अपिलार्थीस माहितीचे अवलोकन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे

मागणी केलेली माहिती अत्यंत विस्तृत स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्यास काही कालावधी लागलेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील निर्णयाव्दारे निर्देशित केल्याप्रमाणे, दि.०४.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, दि.१२.०७.२०२५ रोजी माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे सुचित करण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांना सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थी अवलोकनास्तव कार्यालयात उपस्थित राहिले व त्यांनी अवलोकन केल्याप्रमाणे त्यांना माहिती देण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी माहिती स्विकारण्यास नकार दिलेला आहे. याबाबत उपस्थित पंचासह पंचनामा करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.१२.०७.२०२५ रोजी माहितीचे अवलोकन दिले असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18928 दिनांक :- 30/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

व्दितीय अपील क्रमांक ५२१५/२०२५
बोर्ड क्र.५९

श्री.शेख मुश्ताक नियाज,
रा.कामखेडा, ता.जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, कामखेडा, ता.जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१४.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.वाघमारे एस.बी. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं) श्री.येळंबकर व्ही.बी. उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.०७.२०२५ | सन २०२२ ते २०२५ पर्यंतची घरपट्टी वसुली, नळपट्टी व नळ कनेक्शन वसुली, पंधराव्या वित्त आयोगातील पूर्ण रक्कम खर्च व शिल्लक रकमेची पूर्ण खात्याची माहिती मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१७.१०.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१७.१०.२०२५ रोजी आयोजित केलेल्या प्रथम अपील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याचा प्रयत्न केला असता अपिलार्थी यांनी माहिती स्विकारण्यास नकार दिलेला आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात माहिती व्यक्तिश: हवी असल्याचे नमूद केलेले आहे. तथापि

व्यक्तिशः माहितीची मागणी करुन त्यांनी माहितीकरिता कार्यालयात संपर्क केलेला नाही. म्हणून प्रथम अपील सुनावणीदरम्यान अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. मात्र अपिलार्थी यांनी माहिती स्विकारलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये कोणतेही कारण नमूद केलेले नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी त्यांना व्यक्तिशः माहिती हवी असल्याचे त्यांच्या माहिती अर्जामध्ये नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसे माहितीचे शुल्क ज्ञात करुन घेणे, माहिती प्राप्त करुन घेणे इ. घडामोडी स्वतःहुन ज्ञात करुन घेणे अर्जदाराचे उत्तरदायित्व असते. मात्र असे उत्तरदायित्व या प्रकरणी अपिलार्थी यांनी पार पाडले असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसुन येत नाही. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीस प्रथम अपील सुनावणीदरम्यान व्यक्तिशः माहिती देण्याचा प्रयत्न केला असता अपिलार्थी यांनी माहिती स्विकारण्यास नकार दिलेला आहे. अपिलार्थी यांच्या व्यक्तिशः माहितीच्या मागणीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीदरम्यान केलेला युक्तिवाद विचारात घेता, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18992 दिनांक : 30/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५२१६/२०२५
बोर्ड क्र.६०

श्री.शेख मतीमोद्दीन शरीफोद्दीन,
रा.कामखेडा, ता.जि.बीड

अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, कामखेडा, ता.जि.बीड

: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, बीड

: उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१४.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.वाघमारे एस.बी. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.येळंबकर व्ही.बी. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.०८.२०२५ | कामखेडा ग्रामपंचायत मधील सरपंच व ग्रामसेवक यांचे बँक खात्याचे सही नमुना मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्या मागणीप्रमाणे माहिती नसल्याचा समज करुन माहिती स्विकालेली नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना देय होणारी माहिती आज रोजी अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्याबाबतची कार्यवाही

अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये कोणतेही कारण नमूद केलेले नाही. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदर माहिती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18993 दिनांक : 30/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५२१८/२०२५
बोर्ड क्र.६१

श्री.केशव दादाराव तांदळे,
रा.वंजारवाडी, ता.जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
पंचायत समिती, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१४.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३१.०७.२०२४ | श्री.सानप अनिरुध्द, गट विकास अधिकारी पं.स.बीड यांचे कार्यकाळातील कॅशबुक, इनवर्ड, आऊटवर्ड रजिस्टरच्या सत्यप्रती, त्यांच्या कार्यकाळातील सर्व विभागाच्या दिलेल्या वर्क ऑर्डर, इस्टिमेट व दिलेल्या बिलांच्या सत्यप्रती, सर्व कामाच्या मोजमाप पुस्तिका इ. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती उपलब्ध न केलेबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत व मोघम स्वरुपाची असल्याचे दिसुन येत आहे. तथापि अशा स्वरुपातील माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या

प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18994 दिनांक : 30/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १८१/२०२५**
**बोर्ड क्र.६२**

श्री.सत्यप्रेम रतनराव बोबडे,
रा.बोबडेवाडी, पो.साळेगाव, ता.केज, जि.बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय जलसंधारण अधिकारी,
जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उपविभाग केज, जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, केज, जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१३.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय जलसंधारण अधिकारी, श्री.एस.पी.सोळंके, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.ठोकर ए.एम., क.प्र.अ. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.११.२०२४ | विहिरीचे को.पा.बंधाऱ्यामुळे झालेले नुकसान दुरुस्त करुन मिळणेबाबत, अर्जदार नामे अशोक सत्यप्रेम बोबडे यांनी दिलेला विनंती अर्ज दि.०८.११.२०११ ची केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली बहुतांश माहिती मिळालेली आहे. माहितीची मागणी करण्यामागील पार्श्वभूमी अशी आहे की, स्वत:च्या विहिरीचे बंधाऱ्यामुळे नुकसान झाले असुन याबाबत जलसंधारण विभागाकडे विहिरीच्या दुरुस्तीबाबत पाठपुरावा करण्यात आलेला आहे. या संदर्भात माहितीचा अर्ज सादर करुन माहितीची मागणी केलेली आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी बहुतांश माहिती दिलेली आहे. तसेच विहिरीची दुरुस्ती करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आश्वासित केले असल्यामुळे विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यास हरकत नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०२.०१.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी आठ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.३१.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती / माहितीसंदर्भातील वस्तुस्थितीबाबत अवगत करण्यात आलेले आहे. तसेच अपिलार्थीस माहितीची मागणी करण्यामागे ज्या कार्यवाहीची अपेक्षा आहे ती कार्यवाही व्यक्तिशः लक्ष पुरवून पूर्ण करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी बहुतांश माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, माहिती अधिकारातंर्गत एखाद्या कार्यवाहीची अपेक्षा करणे ही बाब कलम २ (च) मधील माहितीच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ठ होत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18992 दिनांक :- 30/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १००९/२०२५
बोर्ड क्र.६३

श्री.आरेफ नामदार शेख,
रा.अंबासाखर कारखाना, वाघाळा, ता.अंबाजोगाई, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत काळेगाव घाट, ता.केज, जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, केज, जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१०.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.नखाते पी.बी. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (प), श्री.ए.बी.चौरे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.१०.२०२४ | १. ग्रामपंचायत कार्यालय काळेगाव घाट ता.केज, जि.बीड येथील सन १९५० ते १९८० चे जन्म आणि मृत्यू नोंदणी रजिस्टरांची प्रमाणित नक्कल,<br>२. ग्रामपंचायत कार्यालय काळेगाव घाट ता.केज, जि.बीड येथील सन १९५० ते २०१० पर्यंतचे नमुना नंबर ८ ची असेसमेंट लिस्ट रजिस्टरांची प्रमाणित प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दोन विषयाशी संबंधित आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला. तथापि दरम्यानच्या कालावधीमध्ये अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०९.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, प्रथम विषयाची माहिती सात दिवसात उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती

अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन दि.१२.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, काळेगाव घाट ग्रामपंचायत कार्यालयात सन १९७८ चे मृत्यू नोंदणी रजिस्टर उपलब्ध नसल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०९.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे प्रथम विषयाची माहिती सात दिवसात उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना निर्देशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देत नाहीत, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती एका पेक्षा जास्त विषयाशी संबंधित आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील पहिल्या विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात त्यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18998 दिनांक :- 30/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३४९३/२०२५**
**बोर्ड क्र.६४**

श्री.वायबसे अशोक सतेश,
रा.हादगाव, ता.केज, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, हादगाव, ता.केज, जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, केज, जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२८.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (प) श्री.ए.बी.चौरे उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.०४.२०२५ | १. ग्रामपंचायतमध्ये १४ व १५ वा वित्त आयोग निधी, ग्रामनिधी, अन्य कोणता निधी मधुन मंजूर झालेली कामांची यादी, सदर कामासाठी झालेला खर्च याची माहिती,<br>२. मंजुर कामांमध्ये पूर्ण झालेली कामांची यादी, प्रलंबित असणाऱ्या कामाची यादी, कोणती कामे रद्द झाली असल्यास त्याची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१९.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे सात दिवसात विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली नसल्यास आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊन माहिती प्राप्त झाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१९.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, हादगाव, ता.केज, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, हादगाव, ता.केज, जि.बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, केज, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र. 19033 दिनांक : 31/12/2025 **नोंदणीकृत टपालाव्दारे**

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३७४० ते ३७४३/२०२५ (०४)**

श्री.वाघमारे बालाजी गंगाधर,
रा.आडस, ता.केज, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, आडस, ता.केज, जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, केज, जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०८.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये चार द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.एस.जी.कांबळे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.शेडेवाड आर.एच. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या चार जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ६५ | ०५.०३.२०२५ | मार्च २०१४ ते मार्च २०२५ या कालावधीत १४ वा वित्त आयोगाविषयी, |
| ६६ | ०५.०३.२०२५ | मार्च २०१४ ते मार्च २०२५ या कालावधीत मनरेगा अंतर्गत झालेल्या कामाविषयी, |
| ६७ | ०५.०३.२०२५ | मार्च २०१४ ते मार्च २०२५ या कालावधीत १५ वा वित्त आयोगाविषयी, |
| ६८ | ०५.०३.२०२५ | मार्च २०१४ ते मार्च २०२५ या कालावधीत दलित वस्तीत केलेल्या कामाबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप पर्यंत मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलांवर सुनावणी घेऊन सात दिवसात माहिती देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही माहिती देण्यात आलेली नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्ज गांभिर्याने हाताळलेले नसल्यामुळे त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई अनुसरण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या

अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत व मोठ्या कालावधीची आहे. याबाबत आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलांवर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना निर्देशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलांवर दि.०५.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, सात दिवसात अपिलार्थीस कार्यालयात बोलावून आवश्यक माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक स्वरुपाची व मोठ्या कालावधीची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, आडस, ता.केज, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद चारही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. सदर अवलोकनाच्यावेळी अपिलार्थी यांनी त्यांना चारही माहिती अर्जातील नेमक्या कोणत्या एक वर्ष कालावधीची माहिती आवश्यक आहे याबाबत जन माहिती अधिकारी यांना अवगत करावे. त्यानुसार अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली (केवळ एक वर्ष कालावधीची) प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, आडस, ता.केज, जि.बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.
३. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, केज, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
४. उपरोक्त निर्देशासह चार व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 19036 दिनांक : 31/12/2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३७७५, ३७७६ व ३७७८/२०२५ (०३)**

श्री.गंगाधर अंबादास पौळ,
रा.बोरीसावरगाव, ता.केज, जि.बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, बोरीसावरगाव, ता.केज, जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, केज, जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.जे.एम.कडू उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ६९ | २८.०५.२०२५ | मौजे बोरीसावरगाव या ग्रामपंचायतला गावातील सन २०१९ पासुन आजपर्यंत घरपट्टी व नळपट्टी प्रति वर्षी किती वसुल करण्यात आली व वसुल करण्यात आलेली घरपट्टी व नळपट्टी कशासाठी खर्च करण्यात आली त्याबाबतची सविस्तर माहिती, |
| ७० | २८.०५.२०२५ | मौजे बोरीसावरगाव या ग्रामपंचायत कार्यालयाने सन २०१९ पासुन आजपर्यंत ग्रामसभा व मासिक मिटींगमध्ये झालेले ठराव व विषय यांची तसेच मंजुर करण्यात आलेल्या किती ठरावांची अंमलबजावणी करण्यात आली याबाबत सविस्तर माहिती, |
| ७१ | २८.०५.२०२५ | मौजे बोरीसावरगाव या ग्रामपंचायतने मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी ग्रामपंचायतच्या एकुण उत्पन्नाच्या १५ टक्के रक्कम प्रतिवर्षी खर्च केली पाहिजे, सदर १५ टक्के रक्कम सन २०१९ पासुन आजपर्यंत मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी खर्च केली आहे, केली असेल तर त्याची सविस्तर माहिती, केली नसेल तर १५ टक्के रकमेचा उपयोग कशासाठी केला, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप पर्यंत मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलांवर सुनावणी घेऊन सात दिवसात माहिती देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही माहिती देण्यात

आलेली नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्ज गांभिर्याने हाताळलेले नसल्यामुळे त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई अनुसरण्यात यावी.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलांवर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना निर्देशित करण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत व मोठ्या कालावधीची आहे. याबाबत आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न देऊन माहिती दडवून ठेवण्याचा प्रयत्न, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलांवर दि.११.०७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक स्वरुपाची व मोठ्या कालावधीची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बोरीसावरगाव, ता.केज, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद तीनही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बोरीसावरगाव, ता.केज, जि.बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, केज, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 19035 दिनांक : 31/12/2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४३८२/२०२५
बोर्ड क्र.७२

श्री.मनोजकुमार रावसाहेब चंदनशिवे, - अपिलार्थी
रा.भोपला, पो.बारेगाव (बु), ता.केज, जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, भोपला, ता.केज, जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, केज, जि.बीड

(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२३.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.शिंदे ए.एम. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), श्री.ए.बी.चौरे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०३.२०२५ | दि.२४.०१.२०२५ रोजी आपल्या कार्यालयात लेखी अर्ज दाखल केलेला आहे (त्याची प्रत सोबत जोडलेली आहे) त्याबाबत पाच मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी या पदाचा पदभार नुकताच स्विकारलेला आहे. अपिलार्थी यांनी सादर केलेला माहिती अर्ज निदर्शनास आला नसल्यामुळे माहिती देता आलेली नाही. तथापि प्रस्तुत प्रकरणाच्या आयोगाकडील सुनावणी नोटीस सोबत अपिलार्थी यांचा माहिती अर्ज कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१३.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे सात दिवसात

विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे. आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, भोपला, ता.केज, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, केज, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.- 18997 दिनांक : 30/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४४३१ व ४४३२/२०२५**
**बोर्ड क्र.७३ व ७४**

श्री.सचिन राजेभाऊ गायकवाड, — अपिलार्थी
रा.पिंपळगव्हाण, ता.केज, जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपअभियंता,
जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, केज, जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, केज, जि.बीड

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२६.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, श्रीमती साळवे वंदना नारायणराव, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.ठोकर ए.एम., कनिष्ठ प्रशासन अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ७३ | ०७.०४.२०२५ | ग्रामपंचायत कार्यालय पिंपळगव्हाण ता.केज येथील जलजिवन मिशन अंतर्गत मंजूर असलेल्या कामाची संचिका व झालेल्या कामाची मोजमाप पुस्तिका मिळणेबाबत, ग्रामपंचायतीकडुन घेण्यात आलेल्या सर्व ना हरकती, ग्रामपंचायतीचा ठराव मिळणेबाबत, |
| ७४ | ०७.०४.२०२५ | जलजिवन मिशन अंतर्गत पिंपळगव्हाण येथील पाण्याच्या टाकीचे बांधकाम करण्याकरिता जागा उपलब्ध प्रस्ताव ग्रामपंचायतीला पाठविण्यात आला त्याची माहिती मिळणेबाबत, ग्रामपंचायतने आपल्या कार्यालयास देण्यात आलेली किंवा ठेकेदारास देण्यात आलेले सर्व पाण्याच्या टाकी बांधकाम संबंधित सर्व कागदपत्रे देणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस कनिष्ठ अभियंता यांच्यामार्फत व्यक्तिश: देण्याचा प्रयत्न केला असता अपिलार्थी यांनी माहिती स्विकारलेली नाही. म्हणून दि.०७.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध माहिती शिघ्र टपालाव्दारे अपिलार्थीस पाठविण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जानुसार ज्या ग्रामपंचायत कार्यालयाशी संबंधित माहितीची जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली आहे त्या ग्रामपंचायतीचे अपिलार्थी हे सरपंच आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडुन माहिती अर्जात नमूद ज्या कामाची अंमलबजावणी करण्यात

आलेली आहे त्या कामाबाबत ग्रामपंचायत व ग्रामपंचायतीचे सरपंच दोघेही अनभिज्ञ आहेत. सदर कामाची शहानिशा होण्याच्या दृष्टीकोनातुन माहिती अधिकारातंर्गत माहितीची मागणी करण्यात आलेली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडुन कोणतीही सकारात्मक अथवा समाधानकारक माहिती देण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडुन व्यक्तिश: माहिती मिळालेली नाही. तसेच त्यांनी शिघ्र टपालाने पाठविलेली माहिती देखील मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी शिघ्र टपालाव्दारे माहिती पाठविली असल्यास तसा पुरावा आयोगासमोर सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नसल्यामुळे व सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, माहिती कार्यालयात उपलब्ध नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती शिघ्र टपालाने पाठविली असल्याबाबतचा तसेच व्यक्तिश: दिली असल्याबाबतचा कोणताही पुरावा आयोगाच्या पटलावर सादर केलेला नाही. अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.११.०९.२०२५ रोजी सुनावणी घेऊन सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे माहिती अर्ज अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत हाताळले असल्याचे दिसुन येत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अशी माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम २ (j) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, केज, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद दोनही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, केज, जि.बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत हाताळलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिश:** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, केज, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19034 दिनांक : 31/12/2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४५२४, ४५२६ ते ४५२८, ४५३२ व ४५३३/२०२५ (०६)

डॉ.महादेव आश्रुबा कोरसळे,
रा.युसूफवडगाव, ता.केज, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, युसूफवडगाव, ता.केज, जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, केज, जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०३.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये सहा द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे विधीज्ञ, अॅड.एम.डी.गिते व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ए.बी.चोरे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या सहा जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ७५ | २९.०४.२०२५ | सन २०२२ मधील आरोग्य उपकेंद्र युसूफवडगाव येथील खोली बांधकामासाठी वापरलेल्या साहित्याचा उदा. लोखंड, वाळु, सिमेंट याचा Quality Control चा अहवाल देण्यात यावा, |
| ७७ | २९.०४.२०२५ | सन २०२२, युसुफवडगाव येथील आरोग्य उपकेंद्र येथील खोली बांधकामाची GST बिले देण्यात यावीत, |
| ७८ | २९.०४.२०२५ | सन २०२२, युसुफवडगाव येथील वर्गखोली बांधकामासाठी मागितलेले तुलनात्मक दरपत्रक व दरपत्रकाचा तक्ता याची माहिती, |
| ७९ | २९.०४.२०२५ | सन २०२२, युसूफवडगाव जि.प. प्राथमिक शाळा येथील वर्ग खोली बांधकामाचे साहित्य खरेदीचे निविदा किंवा ई-निविदा मिळणेबाबत, |
| ८३ | २९.०४.२०२५ | प्राथमिक शाळा युसूफवडगाव येथील वर्गखोली बांधकामासाठी २०२२ मधे वापरलेल्या बांधकाम साहित्य उदा. सिमेंट, लोखंड इ. ची GST सहित बिले देण्यात |

| | | |
|---|---|---|
| | | यावीत, |
| ८४ | २९.०४.२०२५ | २०२२ मधील युसूफवडगाव येथील आरोग्य उपकेंद्र येथील खोली बांधकामाचे मागितलेले तुलनात्मक दरपत्रक व दरपत्रकाचा तुलनात्मक तक्ता याची माहिती मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे विधिज्ञ यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांचेकडे सहा माहिती अर्ज सादर केलेले आहेत. तथापि एकाही माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेल्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. तथापि प्रथम अपील दाखल करण्यास विलंब झाला असल्याचा निष्कर्ष काढुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सर्व प्रथम अपिले निकाली काढलेली आहेत. वास्तविक जन माहिती अधिकारी विलंबाने का होईना माहिती देतील असा समज झाल्यामुळे प्रथम अपील दाखल करण्यास काही विलंब झालेला आहे. तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रकरणातील वस्तुस्थिती जसे माहितीचे प्रदान झाले किंवा नाही, माहिती का दिली नाही अशा बाबींची शहानिशा करुन निर्णय देणे अपेक्षित होते. मात्र त्यांनी अशी कोणतीही वस्तुस्थिती विचारात न घेता प्रथम अपील दाखल करण्यास झालेल्या विलंबाच्या सबबीवरुन प्रथम अपिले निकाली काढलेली आहेत. सदर मागणी केलेली माहिती जनहिताशी निगडित असुन माहिती प्राप्त होण्यास विलंब झाला असल्यामुळे अशी माहिती अर्जदारास विनामूल्य प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचा निर्णय बाजूला सारुण विचाराधिन व्दितीय अपिलात माहिती देण्याबाबत अपिलार्थीच्या पक्षात निर्णय पारित व्हावा, अशी विनंती आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या सर्व प्रथम अपिलांवर दि.०६.०८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांनी सादर केलेले प्रथम अपील अर्ज मुदतबाह्य असल्यामुळे सर्व प्रथम अपिले निकाली काढण्यात आलेली आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यात आली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे विधिज्ञ यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन सादर केलेली प्रथम अपिले ही मुदतबाह्य असल्याचा निष्कर्ष काढुन प्रथम अपिले निकाली काढलेली आहेत. जन माहिती अधिकारी यांनी ज्या दिनांकास प्रतिसाद दिला अथवा माहिती दिली त्या दिनांकापासुन अथवा माहिती अर्ज सादर केल्यानंतर ३० दिवसाचा कालावधी ज्या दिनांकास पूर्ण झाला त्या दिनांकापासुन पुढील ३० दिवसात व जास्तीत जास्त ४५ दिवसात प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांचे प्रथम अपिलाचे अर्ज जवळजवळ ४० दिवसाच्या विलंबाने सादर केलेली आहेत. ही बाब विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलांवर केलेली कार्यवाही योग्य असल्याचे दिसुन येत आहे. मात्र या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला असल्याचे अथवा अपिलार्थीस माहिती दिली असल्याचे दिसुन येत नाही. या बाबीची आयोग गंभीर दखल घेत असुन भविष्यात अशी पुनरावृत्ती होणार नाही, याची संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दक्षता घ्यावी. अन्यथा विलंबाकरिता जबाबदार धरण्यात येऊन त्यांचेविरुध्द अधिनियमातील तरतुदीनुसार यथोचित कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, याची संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी गांभिर्याने नोंद घ्यावी. तसेच अपिलार्थी यांनी भविष्यात माहिती अधिकारातंर्गत प्रथम अपील दाखल करताना अधिनियमाव्दारे प्रथम अपील दाखल करण्याची निश्चित केलेली मुदत विचारात घेऊन मुदतीत प्रथम अपील दाखल करण्याची दक्षता घ्यावी. अत: या प्रकरणी अपिलार्थी यांना माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलांवर दि.०६.०८.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये अंशत: बदल करुन आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, युसूफ वडगाव, ता.केज, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद सहा जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस

दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज **२५ पृष्ठांची** माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार **विनामूल्य** उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज **२५ पेक्षा अधिक** पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती **सशुल्क** उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, केज, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह सहा व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 19000 दिनांक : 30/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४५२५ व ४५२९ ते ४५३१/२०२५ (०४)**

डॉ.महादेव आश्रुबा कोरसळे,
रा.युसूफवडगाव, ता.केज, जि.बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपअभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, केज, जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, केज, जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये चार द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.एस.डी.हातागळे, कनिष्ठ अभियंता उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या चार जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ७६ | ३०.०४.२०२५ | जि.प.प्राथमिक शाळा युसूफ वडगाव येथील वर्गखोली बांधकामास (२०२२ मधील) उपअभियंता पंचायत समिती केज यांना भेट दिल्याचा पुरावा म्हणून त्यांचा दौरा दैनंदिनी याची सत्यप्रत, |
| ८० | ०७.०६.२०२५ | जि.प.प्राथमिक शाळा युसूफ वडगाव येथील वर्गखोली बांधकामास (२०२२ मधील) उपअभियंता पंचायत समिती केज यांनी भेट दिल्याचा पुरावा म्हणून शासकीय वाहनाचे लॉकबुक याची सत्यप्रत, |
| ८१ | ३०.०४.२०२५ | युसूफ वडगाव येथील आरोग्य उपकेंद्र खोली बांधकामाला उपअभियंता पंचायत समिती केज यांनी भेट दिल्याचा पुरावा म्हणून त्याचा शासकीय वाहनाचे लॉगबुक सत्यप्रत, |
| ८२ | ३०.०४.२०२५ | युसूफ वडगाव येथील आरोग्य उपकेंद्र येथील खोली बांधकामाला उपअभियंता पंचायत समिती केज यांनी भेट दिल्याचा पुरावा म्हणून त्यांच्या दौरा दैनंदिनी याची सत्यप्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी उपअभियंता यांच्या वाहनासंदर्भातील माहिती मागितलेली आहे. याबाबत असे नमूद करण्यात येत आहे की, उपअभियंता यांना कार्यालयीन शासकीय वाहन अनुज्ञेय नसल्याने अपिलार्थी यांनी मागणी केलेली बहुतांश माहिती निरंक आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलांवर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०५.०८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन अपिलार्थीस माहितीचे प्रदान झाले किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली नसल्यास अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती / वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यात आली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, केज, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद चारही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, केज, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह चार व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. १९०० दिनांक : 30/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४६२८ ते ४६३०/२०२५ (०३)**
**बोर्ड क्र.८५ ते ८७**

डॉ.संपत भानुदास वाघमारे, अपिलार्थी
रा.पंचशिला नगर, नालंदा कॉलनी, जुन्या सरस्वती शाळेजवळ,
बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, पिंपळगव्हाण, ता.केज, जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, केज, जि.बीड

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.शिंदे ए.एम. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.मस्के व्ही.आर. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ८५ | ०६.०५.२०२५ | मौ.पिंपळगव्हाण, ता.केज येथील भूमिहिन मागासवर्गीयांना / गरीब भुमिहिनाना संपादित क्षेत्र ९२ आर / ८७.१० आर शासनाच्या कृतीआराखड्याप्रमाणे पूर्व पश्चिम रोडची लांबी रुंदी, प्रत्येक आठ कुटूंबानंतर उत्तर दक्षिण रोडची लांबी रुंदी व रोड किती याचा प्रमाणित नकाशा द्यावा, |
| ८६ | ०६.०५.२०२५ | मौ.पिंपळगव्हाण ता.केज येथील भूमिहिन मागासवर्गीयांना / गरीब भुमिहिनाना संपादित क्षेत्र ९२ आर / ८७.१० आर शासनाच्या कृतीआराखड्याप्रमाणे वाटप केल्याचे मोजणी सिट प्रमाणित करुन देण्यात यावे, |
| ८७ | ०६.०५.२०२५ | मौ.पिंपळगव्हाण ता.केज येथील भूमिहिन मागासवर्गीयांना / गरीब भुमिहिनाना संपादित क्षेत्र ९२ आर / ८७.१० आर शासनाच्या कृतीआराखड्याप्रमाणे प्रत्येक लाभार्थी ३३ x ३३ प्रमाणे वाटप तक्ता व सर्वांचे प्रमाणित पीटीआर देण्यात यावेत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी या पदाचा पदभार नुकताच स्विकारलेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलांवर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना निर्देशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, पिंपळगाव, ता.केज, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, केज, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19002 दिनांक : 30/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४०३६/२०२५**
**बोर्ड क्र.८८**

श्री.अशोक तुकाराम चाटे, — अपिलार्थी
रा.तांबवा, ता.केज, जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, तांबवा, ता.केज, जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, केज, जि.बीड

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.केदार एच.आर. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), रोडेवाड आर.एच. उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०३.२०२५ | १.मौजे तांबवा ग्रा.पं. अंतर्गत ०१ जानेवारी २०२३ ते २० मार्च २०२५ पर्यंत घरकुले, गाय गोठे, विहीरी किती मंजुर झालेल्या आहेत, ते कोण-कोणास मंजूर झाले त्यांचे नाव, मंजुरीपैकी किती अपूर्ण झाले त्याचा सविस्तर तपशिल, २. मंजुर झालेले रस्ते, रस्त्याचे नाव, लांबी रुंदी व उंची याची माहिती तसेच इतर कोणकोणत्या योजना ग्रामपंचायत कार्यालयातंर्गत मंजूर आहेत, ३. केज तालुक्यातील मंजुरीबाबत अथवा मंजुर झालेल्या विहीर, घरकुल यासाठी दिलेले रु.१००, २००, ५०० रु. चे नोटरी केलेल्या २०२४ मधील १०० बॉंड प्रती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी या पदाचा पदभार नुकताच स्विकारलेला आहे. अपिलार्थी यांनी सादर केलेला माहिती अर्ज निदर्शनास आला नसल्यामुळे माहिती देता आलेली नाही. तथापि प्रस्तुत प्रकरणाच्या आयोगाकडील सुनावणी नोटीस सोबत अपिलार्थी यांचा माहिती अर्ज कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती

आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०६.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे एका विषयाची माहिती सात दिवसात विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे. आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन ती एका पेक्षा जास्ती विषयाशी निगडित आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील पहिल्या विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, तांबवा, ता.केज, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी एका विषयावरील माहिती (माहिती अर्जातील पहिल्या विषयाची), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, केज, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19003 दिनांक : 30/12/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २०५/२०२५**
**बोर्ड क्र.८९**

श्री.मुक्ताराम खेमाजी गवळी,
रा.इंजेगाव, ता.परळी वैजनाथ, जि.बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, इंजेगाव, ता.परळी वै., जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, परळी वै., जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.गोरे डी.डी. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.रोडगे आर.बी. उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना देण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जात नमूद कामाबाबत तक्रार देखील सादर केलेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाहीअंती सर्व अभिलेख व कामाचे अपिलार्थीस अवलोकन देण्यात आलेले आहे. त्यानुसार अपिलार्थी यांनी दि.११.०९.२०२५ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वै., जि.बीड यांना उद्देशुन लेखी निवेदन दिलेले आहे. या निवेदनामध्ये त्यांनी, १५ वा वित्त आयोग, सर्व योजना आणि दलित वस्तीतील कामे नियमाप्रमाणे केलेली दिसुन येत असल्याचे, कामाबाबत समाधानी असल्याचे व कामाबाबत कसलीही तक्रार राहिली नसल्याचे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये कोणतेही कारण नमूद केलेले नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमक्ष केलेला युक्तिवाद व अपिलार्थी यांचे दि.११.०९.२०२५ रोजीचे लेखी निवेदन विचारात घेता, अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत:, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18996 दिनांक : 30/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३५८ ते ३६१/२०२५ (०४)**
**बोर्ड क्र.९० ते ९३**

श्री.सय्यद इम्रान पिता याकुब,
रा.मेन रोड, सिरसाळा, ता.परळी वैजनाथ, जि.बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, सिरसाळा, ता.परळी वै., जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, परळी वै., जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये चार द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.ए.सी.शेख. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), शेंडगे आर.बी. उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना देण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी संपूर्ण माहिती व्यक्तिश: स्विकारुन दि.१८.११.२०२४ रोजी बोर्ड क्र.९०, ९१ व ९२ मधील माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना उद्देशुन लेखी निवेदन दिलेले आहे. तसेच बोर्ड क्र.९३ मधील माहिती अर्जासंदर्भात अपिलार्थी यांनी दि.१८.११.२०२५ रोजी लेखी निवेदन दिलेले आहे. या निवेदनामध्ये त्यांनी, माहिती मिळाली असल्याचे व समाधान झाले असल्याचे नमूद करुन माहिती अर्ज निकाली काढण्यात यावा, असे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमक्ष केलेला युक्तिवाद व अपिलार्थी यांचे दि.१८.११.२०२४ व दि.१८.११.२०२५ रोजीचे लेखी निवेदन विचारात घेता, विचाराधिन चारही व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत:, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त चार व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)
**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 18996 दिनांक : 30/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २३५८/२०२५**
**बोर्ड क्र.९४**

श्री.तुकाराम मारोती मुंडे,
रा.टोकवाडी, ता.परळी वै., जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, टोकवाडी, ता.परळी वै., जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, परळी वै., जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१६.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्रीमती सुनिता गणपतराव राजणकर, जन माहिती अधिकारी यांचे विधीज्ञ, श्री.प्रसाद बी.कदम व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.शेंडगे आर.बी. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०१.२०२५ | मौजे टोकवाडी गट नं.४२२ मध्ये ०१ जानेवारी १९९७ ते आजपर्यंत घेतलेल्या सर्व नोंदी व त्या नोंदी ज्या कागदपत्राच्या आधारे घेतल्या त्याच्या सत्यप्रती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२८.०३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांचे विधिज्ञ यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कामाच्या व्यापात उपलब्ध करुन देण्याचे राहुन गेलेले आहे. तथापि अपिलार्थी यांना

आवश्यक असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी एकत्रित / संकलित करुन ती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरिता आज रोजी सोबत आणलेली आहे. आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे सदर माहिती अपिलार्थीस देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थीस देण्यात आली. सदर माहिती अपिलार्थी यांनी आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.: 19005 दिनांक : 30/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २४३५/२०२५**
**बोर्ड क्र.९५**

श्री.रवि उध्दव गुट्टे, — अपिलार्थी
रा.कासारवाडी, ता.परळी वै., जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — :उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, कासारवाडी, ता.परळी वै., जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, परळी वै., जि.बीड

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१८.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.ए.एस.नागरगोजे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.शेंडगे आर.बी. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०३.२०२५ | सन २०१८ ते अद्यापपर्यंत,<br>१. ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील सर्व रहिवाशांच्या घरांची घरपट्टी, घर क्रमांकानुसार / ॲसेसमेंट उताऱ्या नुसार वसुली झालेली संख्या, थकबाकी संख्या तसेच जमा रक्कम थकबाकी टक्केवारी इ. नोंदी असणाऱ्या नोंद वहीची छायाप्रत द्यावी,<br>२. ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील सर्व रहिवाशांच्या पाणीपट्टी, नळ जोडणी नुसार वसुली झालेली संख्या थकबाकी संख्या, तसेच जमा रक्कम टक्केवारी इ. नोंदी असणाऱ्या नोंदवहीची छायाप्रत द्यावी, तसेच सन २०१८ ते अद्यापपर्यंत कासारवाडी येथे ग्रा.पं. मार्फत राबविलेल्या विकास कामाच्या योजनेची आलेल्या निधीसह लेखी माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन

देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०९.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक, मोघमस्वरुपाची व मोठ्या कालावधीची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ठ सफल होत नाहीत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19006 दिनांक :- 30/12/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २४७२/२०२५
बोर्ड क्र.१६

श्री.लक्ष्मण अर्जुनराव सुर्यवंशी,
रा.सारडगाव, ता.परळी वैजनाथ, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, सारडगाव, ता.परळी वैजनाथ, जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, परळी वैजनाथ, जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२०.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.सोनवणे आर.बी., प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.शेंडगे आर.बी., विस्तार अधिकारी (पंचायत) उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०२.२०२५ | पीटीआर ३२३, ३२४, ३२५, ३२६ बाबत दोन मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी या पदाचा पदभार नुकताच स्विकारलेला आहे. अपिलार्थी यांनी सादर केलेला माहिती अर्ज निदर्शनास आला नसल्यामुळे माहिती देता आलेली नाही. तथापि प्रस्तुत प्रकरणाच्या आयोगाकडील सुनावणी नोटीस सोबत अपिलार्थी यांचा माहिती अर्ज कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.११.०७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे सात दिवसात विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे. आयोगाने

आदेशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सारडगाव, ता.परळी वैजनाथ, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, परळी वैजनाथ, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. १९००२ दिनांक : 30/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २४७३/२०२५**
**बोर्ड क्र.९७**

श्री.सिध्देश्वर ज्ञानोबा रेशमे,
रा.धारासूर, ता.गंगाखेड, जि.परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, सारडगाव, ता.परळी वैजनाथ, जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, परळी वैजनाथ, जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२०.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.सोनवणे आर.बी., प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.शेंडगे आर.बी., विस्तार अधिकारी (पंचायत) उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०२.२०२५ | पीटीआर ३२३, ३२४, ३२५, ३२६ बाबत माहिती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी या पदाचा पदभार नुकताच स्विकारलेला आहे. अपिलार्थी यांनी सादर केलेला माहिती अर्ज निदर्शनास आला नसल्यामुळे माहिती देता आलेली नाही. तथापि प्रस्तुत प्रकरणाच्या आयोगाकडील सुनावणी नोटीस सोबत अपिलार्थी यांचा माहिती अर्ज कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२१.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे सात दिवसात विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे. आयोगाने

आदेशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिशः पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सारडगाव, ता.परळी वैजनाथ, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, परळी वैजनाथ, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. १९००४ दिनांक : ३०/१२/२०२५

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३५५४अे/२०२५
बोर्ड क्र.९८

श्री.पारसे कृष्णा महादेव, अपिलार्थी
रा.दौडवाडी, ता.परळी वैजनाथ, जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, दौडगाव, ता.परळी वैजनाथ, जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, परळी वैजनाथ, जि.बीड

(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२८.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.सोनवणे आर.बी., प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.शेंडगे आर.बी., विस्तार अधिकारी (पंचायत) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.१२.२०२४ | १. मौजे दौडवाडी येथे २०२२ ते २०२४ आजतागायत शासनाच्या योजनेतुन झालेल्या विकास कामाची नावासहीत माहिती,<br>२. २०२२-२४ आजतागायत आमदार फंड किंवा खासदार फंड किंवा डीपीडीसी या योजनेतुन झालेल्या कामाची माहिती,<br>३. दलित वस्तीमध्ये झालेल्या विकास कामाची माहिती,<br>४. वित्त आयोग कोठे व किती वापरला याची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. सदर माहिती संदर्भात आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२०.०३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिशः पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती एका पेक्षा जास्त विषयाशी निगडित आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील पहिल्या विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, दौडवाडी, ता.परळी वैजनाथ, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी एका विषयावरील माहिती (माहिती अर्जातील पहिल्या विषयाची), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, परळी वैजनाथ, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 19009 दिनांक :- 30/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३९१२ व ३९१३/२०२५ (०२)**

अॅड.महारुद्र नन्हुराव कराड, — अपिलार्थी
रा.लिंबोट, ता.परळी वैजनाथ, जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, परळी वैजनाथ, जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, परळी वैजनाथ, जि.बीड

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२०.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, श्री.एस.एस.मुंडे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ९९ | २५.०२.२०२५ | पंचायत समिती परळी वै. अंतर्गत राबवल्या जाणाऱ्या वृक्ष संवर्धन कामाचे एकुण (सन २०२२ ते २०२५) मंजुर कामाची यादी, चालु कामे व पूर्ण कामे, पाहणी अहवाल सविस्तर माहिती, |
| १०० | २५.०२.२०२५ | पंचायत समिती परळी वै. अंतर्गत सन २०२२ ते २०२५ मध्ये रोहयो योजनेमधील मागेल त्याला शेततळे या कामाची चालु कामे, मंजूर कामे व पूर्ण झालेल्या कामाची माहिती, वर्क ऑर्डर, पाहणी अहवाल, एमबी, अॅगल कॅमेरासह लोकेशन छायाचित्र, |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती बहुतांश माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.०४.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेली माहिती nreganarep.nic.in या संकेतस्थळावर (Mis Report मध्ये R6 Work Progress मध्ये) उपलब्ध असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, चार दिवसात विनामूल्य

माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या दि.१६.०५.२०२५ रोजीच्या सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जवळजवळ ५६ पृष्ठांची माहिती उपलब्ध करुन दिलेली असुन उर्वरित जवळजवळ ६७० पृष्ठांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.२९.०५.२०२५ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेल्या सर्व माहितीचे अपिलार्थीस प्रदान झालेले आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कार्यालयीन अभिलेखातुन एकत्रित / संकलित करुन ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे अपेक्षित असल्यामुळे माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडुन काही विलंब झालेला आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकाऱ्याच्या निर्णयानुसार चार दिवसात माहिती दिलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी विलंबाने माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. तथापि अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त होण्याकरिता काही विलंब झालेला आहे. मात्र आज रोजी सुनावणीदरम्यान माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता झालेल्या विलंबाकरिता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी नमूद केलेले कारण विचारात घेता, या प्रकरणी कलम ७ (१) चा जाणीवपूर्वक भंग दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. १९००५ दिनांक : 30/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३९२७ व ३९२८/२०२५ (०२)**

श्री.बाबु सोमाजी गवळी,
रा.सारडगाव, पो.मांडवा, ता.परळी वैजनाथ, जि.बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, सारडगाव, ता.परळी वैजनाथ, जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, परळी वैजनाथ, जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.सोनवणे आर.बी., प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.शेंडगे आर.बी., विस्तार अधिकारी (पं), उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १०१ | ०८.०४.२०२५ | कशाचे आधारे नावाची नोंद केली त्याची प्रत व फेरफार आणि पीटीआर क्र.२०५ मिळणेबाबत, |
| १०२ | ०८.०४.२०२५ | कशाचे आधारे नावाची नोंद केली त्याची प्रत व फेरफार आणि पीटीआर क्र.९२४, ३२५, ३२६ मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२५.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व

कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, आदेश मिळालेला नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सारडगाव, ता.परळी वैजनाथ, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद दोनही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, परळी वैजनाथ, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19010 दिनांक : 30/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३९६३/२०२५
बोर्ड क्र.१०३

श्री.तुकाराम मारोती मुंडे,
रा.टोकवाडी, ता.परळी वैजनाथ, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, टोकवाडी, ता.परळी वै., जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, परळी वै., जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२५.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्रीमती सुनिता गणपतराव रांजणकर व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.शेंडगे आर.बी. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.०४.२०२४ | किर्द बुक, २५/५ दलित वस्ती, १४ वा वित्त आयोग, आमदार फंड, खासदार फंड यांचे अंदाजपत्रक, एमबी बुक, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१०.०७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता काही कालावधी

लागलेला आहे. सदर एकत्रित / संकलित केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरिता आज रोजी सोबत आणलेली आहे. आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे सदर माहिती अपिलार्थीस देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थीस देण्यात आली. सदर माहिती अपिलार्थी यांनी आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19011 दिनांक : 30/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २१ व २२/२०२५ (०२)**

श्री.संतनु संजय खेडकर,
रा.सावरगाव (चकला), ता.शिरुर कासार, जि.बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, सावरगाव (चकला), ता.शिरुर कासार,
जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०१.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १०४ | २०.०८.२०२४ | ग्रामपंचायत सावरगाव चकला अंतर्गत ग्रामपंचायत नमुना १५ उपभोग्य वस्तुसाठा नोंदवहीची प्रत मिळणेबाबत, सन २०१७-१८ ते आजपर्यंत, |
| १०५ | २०.०८.२०२४ | ग्रामपंचायत सावरगाव चकला अंतर्गत ग्रामपंचायत नमुना १३ कर्मचारी वर्गाची सूची व वेतनश्रेणी नोंदवहीची प्रत मिळणेबाबत, सन २०१७-१८ ते आजपर्यंत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१९.०९.२०२४ व दि.१८.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये असे कळविलेले आहे की, दि.२७.०६.२०२३ रोजी पदभार स्विकारला असुन यापूर्वीची माहिती पदभारात मिळालेली नाही, पदभारानंतरच्या कालावधीतील उपलब्ध माहिती देण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी जुन २०२३ पूर्वीची कोणतीही माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती दिलेली आहे ती देखील त्रोटक स्वरुपाची आहे. एकदंरित माहिती अर्जान्वये

मागणी केलेली बहुतांश माहिती मिळालेली नसल्यामुळे ती उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातुन जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.३०.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, शोध घेऊन १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपिलाच्या निर्णयानुसार माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडुन कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, योग्य माहिती देण्यात आली नाही, अपूर्ण माहिती, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.१८.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, दि.२७.०६.२०२३ रोजी पदभार घेतला असुन या पूर्वीची माहिती पदभारात मिळाली नाही, असे अपिलार्थीस कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.३०.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन शोध घेऊन १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही. अत: अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना सत्वर प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातुन माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड यांना या प्रकरणी आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद दोनही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 19012 दिनांक : 30/12/2024

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २३ ते २६/२०२५ (०४)

श्री.खेडकर श्रीराम बाबासाहेब, — अपिलार्थी
रा.सावरगाव (चकला), ता.शिरुर कासार, जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, सावरगाव, ता.शिरुर कासार, जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड

(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०१.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये चार द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या चार जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १०६ | १३.०९.२०२४ | ग्रामपंचायत सावरगाव (च) खामकरवाडी अंतर्गत मग्रारोहयो योजनेतुन मंजूर कामाची खालीलप्रमाणे माहिती मिळणेबाबत, मंजुर / सुरु असलेले / पूर्ण झालेल्या सार्वजनिक कामाची यादी, कामाचे नाव, प्रशासकीय मान्यता आदेश, तांत्रिक मान्यता आदेश, कामाचे अंदाजपत्रक, मोजमाप नोंदवहीची प्रत, ग्रामसभा ठरावाची प्रत, वितरित निधी, कुशल व अकुशल प्रमाणे वाटप, शासनाकडे अनुदान मागणी सादर केलेला निधी, |
| १०७ | २०.०८.२०२४ | महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत सावरगाव चकला खामकरवाडी ग्रामपंचायत मधील मंजुर कामांची योजनानिहाय व लाभार्थीनिहाय मिळणेबाबत, सन २०१७-१८ ते आजपर्यंत, |
| १०८ | ०९.०९.२०२४ | सन २०१६-२०१७ ते आजपर्यंत, म.ग्रा.रो.ह.योजना निधी व विविध योजनेच्या |

| | | |
|---|---|---|
| | | निधीच्या अभिसरणातुन सावरगाव (च) खामकरवाडी ग्रामपंचायत अंतर्गत पूर्ण झालेल्या इमारतीच्या / सुरु असलेल्या इमारतीच्या व संरक्षण भिंतीच्या कामाबाबत खालीलप्रमाणे माहिती,<br>१. मंजूर कामांची यादी, २. मंजूर कामांची प्रशासकीय मान्यता आदेश, ३. तांत्रिक मान्यता आदेश, ४. कामाचे अंदाजपत्रक, ५. मोजमाप पुस्तिका नोंदवही, ६. मंजूर झालेला निधी व वितरित झालेला निधी, |
| १०९ | २०.०८.२०२४ | ग्रामपंचायत सावरगाव चकला मासिक सभा इतिवृत्त नोंदवही व ग्रामसभा इतिवृत्त नोंदवहीची प्रत मिळणेबाबत, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती पुरविण्यात आलेली नाही, माहिती देण्यात आली नाही, माहिती देत नाहीत, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी बोर्ड क्र.१०६, १०७ व १०८ मधील माहिती अर्ज पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड या कार्यालयाकडे सादर केलेला असुन बोर्ड क्र.१०९ मधील माहिती अर्ज ग्रामपंचायत कार्यालय, सावरगाव (चकला), ता.शिरुर कासार, जि.बीड या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. बोर्ड क्र.१०६ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहायक गट कार्यक्रम अधिकारी, पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड यांनी दि.०७.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, मंजूर / सुरु / पूर्ण / झालेल्या सार्वजनिक कामांची माहिती ही, nrega.nic.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे व उर्वरित माहिती ग्रामपंचायतमध्ये उपलब्ध असल्यामुळे माहिती अर्ज ग्रामपंचायतकडे कलम ६ (३) नुसार वर्ग करण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. सदर वर्ग केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सावरगाव (च) यांनी दि.३१.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, माहितीपोटीच्या रु.१७६८/- इतक्या शुल्काचा भरणा करणेबाबत अपिलार्थी यांना सूचित केलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केला असल्याचे दिसुन येत नाही. बोर्ड क्र.१०७ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहायक गट कार्यक्रम अधिकारी, पंचायत समिती, शिरुर का. यांनी दि.१०.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये ०६ पृष्ठांची माहिती पुरविण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. तसेच या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सावरगाव (च) यांनी त्यांच्या दि.१४.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविण्यात असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. तसेच बोर्ड क्र.१०८ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहायक गट कार्यक्रम अधिकारी, पंचायत समिती, शिरुर का. यांनी त्यांच्या दि.०८.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, मागणी क्र.०१ व ०६ मंजूर कामांची यादी nrega.nic.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे व उर्वरित मागणी क्र.०२ ते ०५ ची माहिती ग्रामपंचायतमध्ये उपलब्ध असल्यामुळे माहिती अर्ज ग्रामपंचायतकडे कलम ६ (३) नुसार वर्ग करण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. सदर वर्ग केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सावरगाव (च) यांनी त्यांच्या दि.३०.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, माहितीपोटीच्या रु.१२८/- इतक्या शुल्काचा भरणा करणेबाबत अपिलार्थी यांना सूचित केलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केला असल्याचे दिसुन येत नाही. तसेच बोर्ड क्र.१०९ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सावरगाव (च) यांनी त्यांच्या दि.१९.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, मासिक सभा इतिवृत्त नोंदवही व ग्रामसभा इतिवृत्त नोंदवही या पत्रासोबत पुरविण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही करुन माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. तसेच बोर्ड क्र.१०६ व बोर्ड क्र.१०९ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीपोटीच्या विहित शुल्काचा भरणा करणेबाबत अपिलार्थीस सुचित केलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी अशा विहित शुल्काचा भरणा केला असल्याचे दिसुन येत नाही. तसेच संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दिलेला

प्रतिसाद विचारात घेता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली काही माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे संकेतस्थळाच्या पत्त्यासह जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविलेले आहे. याबाबत असे नमूद करण्यात येत आहे की, जी माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे ती माहिती कागदपत्र स्वरुपात उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना नमूद केलेल्या प्रयोजनामध्ये आयोगास कोणताही तथ्यांश दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त चार व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 17013 दिनांक : 30/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २७ ते ३२/२०२५ (०६)

श्री.खेडकर विठ्ठल तुकाराम, — अपिलार्थी
रा.सावरगाव (चकला), ता.शिरुर कासार, जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, सावरगाव, ता.शिरुर कासार, जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड

(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०१.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये सहा द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या सहा जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ११० | १६.०९.२०२४ | स्वच्छ भारत मिशन ग्रामीण योजनेतंर्गत ग्रामपंचायत सावरगाव (च) खामकरवाडी मध्ये झालेल्या सर्व कामांची व वैयक्तिक कामांची बाबनिहाय माहिती मिळणेबाबत, सन २०१६-१७ ते आजपर्यंत, |
| १११ | २०.०८.२०२४ | ग्रामपंचायत सावरगाव चकला अंतर्गत ग्रामपंचायत नमुना ३३ वृक्ष नोंदवहीची प्रत मिळणेबाबत, सन २०१७-१८ ते आजपर्यंत, |
| ११२ | १६.०९.२०२४ | सन २००७-०८ ते आजपर्यंत, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना सावरगाव (च) खामकरवाडी मत्ता नोंदवहीची प्रत मिळणेबाबत, |
| ११३ | ०९.०९.२०२४ | मातोश्री ग्रामसमृध्दी शेत / पाणंद रस्ते योजनेतुन सावरगाव (च) खामकरवाडी ग्रामपंचायती अंतर्गत झालेल्या / सुरु असलेल्या कामाची माहिती, सन २०१६-१७ ते आजपर्यंत, |

| | | |
|---|---|---|
| ११४ | २०.०८.२०२४ | ग्रामपंचायत सावरगाव (च) अंतर्गत १४ वा वित्त आयोग व १५ वा वित्त आयोग अंतर्गत मंजूर निधी व खर्च याबाबतचा तपशिल, सन २०१७-१८ ते आजपर्यंत, |
| ११५ | २०.०८.२०२४ | ग्रामपंचायत सावरगाव चकला अंतर्गत ग्रामपंचायत नमुना १६ जड वस्तु संग्रह व जंगम मालमत्ता नोंदवहीची प्रत, सन २०१७-१८ ते आजपर्यंत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांचेकडे सहा माहिती अर्ज सादर केलेले आहेत. तथापि काही माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी काहीच माहिती दिलेली नाही. तर उर्वरित काही माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती दिलेला प्रतिसाद व माहिती त्रोटक स्वरुपाची आहे. सदर माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जनहिताशी संबंधित असुन या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी बहुतांश प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती पुरविण्यात आलेली नाही, दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे, अपूर्ण माहिती, माहिती पुरवित नसल्यामुळे, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सावरगाव (चकला), ता.शिरुर कासार, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद सहा जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.
२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह सहा व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. १९०१५ दिनांक : 30/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३३ ते ३६/२०२५ (०४)

श्री.केशव धर्मराज खेडकर,
रा.सावरगाव (चकला), ता.शिरुर कासार, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, सावरगाव, ता.शिरुर कासार, जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०१.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये चार द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या चार जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ११६ | १३.०९.२०२४ | सावरगाव (च) खामकरवाडी येथे मग्रारोहयोतुन मंजूर झालेल्या जलसिंचन विहीर व शेततळे याबाबतची माहिती मिळणेबाबत, सन २०१०-११ ते आजपर्यंत, |
| ११७ | १६.०९.२०२४ | सन २००७-०८ ते आजपर्यंत, ग्रामपंचायत सावरगाव (च) खामकरवाडी रस्ते नोंदवहीची प्रत मिळणेबाबत, |
| ११८ | २०.०८.२०२४ | महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या कामाच्या रॉयल्टीची रक्कम शासन जमा केलेबाबतचा तपशिल मिळणेबाबत, सन २०१७-१८ ते आजपर्यंत, |
| ११९ | २०.०८.२०२४ | ग्रामपंचायत सावरगाव चकला अंतर्गत ग्रामपंचायत नमुना २४ जमिनीची नोंदवही प्रत मिळणेबाबत, सन २०१७-१८ ते आजपर्यंत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती माहिती अर्जातील मागणीप्रमाणे मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांचेकडे चार माहिती अर्ज सादर केलेले आहेत. तथापि बोर्ड क्र. ११६ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी काही माहिती वैयक्तिक असल्यामुळे परवानगीची आवश्यकता असल्याचे व उर्वरित माहितीकरिता रु.८०६/- इतक्या शुल्काचा भरणा करणेबाबत मोघमपणे कळविलेले आहे. तसेच बोर्ड क्र.११७ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली असुन पुरविलेली माहिती माहिती अर्जातील मागणीप्रमाणे नाही. बोर्ड क्र.११८ व ११९ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील अभिलेख तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी यांच्याकडुन अप्राप्त असल्याचे कळविलेले आहे. जन माहिती दिलेला प्रतिसाद व माहिती त्रोटक स्वरुपाची आहे. सदर माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जनहिताशी संबंधित असुन या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी बहुतांश प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन, शोध घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती पुरवित नसल्यामुळे, माहिती उपलब्ध नसल्याबाबत पत्र दिले, उडवाउडवीची उत्तरे देतात, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जांव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सावरगाव (चकला), ता.शिरुर कासार, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद चार जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.
२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह चार व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. १९०१५ दिनांक :- 30/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २८३३ ते २८३५/२०२५ (०३)**

श्रीमती सुनिता गोवर्धन दराडे,
रा.आव्हळवाडी / हाटकरवाडी, ता.शिरुर कासार, जि.बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, हाटकरवाडी / आव्हळवाडी, ता.शिरुर कासार, जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १२० | १८.०३.२०२५ | ०१ एप्रिल २०२१ ते २०२५ पर्यंत ग्रामपंचायतीच्या एकुण किती ग्रामसभा भरवल्या गेल्या प्रत्येक ग्रामसभेला उपस्थित पुरुष व महिला त्यांची नावे व पत्ते मिळावेत, ग्रामसभेत मंजूर झालेल्या सर्व ठरावांची छायांकित प्रत, |
| १२१ | १८.०३.२०२५ | ग्रामपंचायतला ०१ एप्रिल २०२१ ते २०२५ पर्यंत केंद्र शासन, राज्य शासन व इतर मार्गाने कोणकोणत्या उद्देशाने निधी, अनुदान किंवा मदत मिळाली आहे, या रकमेचा विनियोग कोठे केला व कसा झाला याची छायांकित प्रतीत माहिती, |
| १२२ | १८.०३.२०२५ | ग्रामपंचायतीच्या मागील चार वर्षाच्या ऑडिट रिपोर्टची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला

नाही. संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपील अर्जाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जाणुन बुजून कसलाही पत्र व्यवहार केला नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, हाटकरवाडी / आव्हाळवाडी, ता.शिरुर कासार, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद तीनही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, हाटकरवाडी / आव्हाळवाडी, ता.शिरुर कासार, जि.बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिश:** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२२.०४.२०२५ रोजीच्या तीन प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.19032 दिनांक : 31/12/2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २८३६ ते २८३८/२०२५ (०३)**

श्री.गोवर्धन महादेव दराडे,
रा.आव्हळवाडी / हाटकरवाडी, ता.शिरुर कासार, जि.बीड ... अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, हाटकरवाडी / आव्हळवाडी, ता.शिरुर कासार, जि.बीड ... : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड ... : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १२३ | १८.०३.२०२५ | ग्रामपंचायतीने सन २०२१ ते २०२५ दरम्यान कोणती विकास कामे केली याबाबत माहिती, |
| १२४ | १८.०३.२०२५ | पॉवर प्लँट या कंपनीसाठी ग्रामपंचायतीला प्राप्त झालेला अर्ज त्यावर करण्यात आलेला ठराव व त्यासाठी देण्यात आलेली ना-हरकत दाखले मिळणेबाबत, |
| १२५ | १८.०३.२०२५ | १५ वा वित्त आयोग सन २०२०/२०२१ ते २०२४/२०२५ या वर्षात आव्हळवाडी / हाटकरवाडी ग्रामपंचायतीमध्ये करण्यात आलेला जमा खर्च मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपील अर्जाची दखल

घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जाणुन बुजून कसलाही पत्र व्यवहार केला नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, हाटकरवाडी / आव्हाळवाडी, ता.शिरुर कासार, जि.बीड यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद तीनही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, हाटकरवाडी / आव्हाळवाडी, ता.शिरुर कासार, जि.बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२२.०४.२०२५ रोजीच्या तीन प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रशांत

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19031 दिनांक : 31/12/2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४६३३/२०२५**
**बोर्ड क्र.१२६**

श्री.वारे राजेंद्र पांडुरंग,
रा.खोपटी, पो.पिंपळवंडी, ता.शिरुर कासार, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, खोपटी, ता.शिरुर कासार, जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०९.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०६.२०२५ | संन २०२२-२३ ते सन २०२४-२५,<br>१. खोपटी ग्रामपंचायतीने किती जलसिंचन विहिरी, शेततळे, गायगोठे व घरकुले यांना मंजुरी मिळाली आहे, त्याची लाभार्थ्यांच्या नावासह यादी व त्यावरील खर्च व शिल्लक याची माहिती,<br>२. ग्रा.पं. खोपटी अंतर्गत किती पांणद रस्ते मंजुरी मिळाली आहे व ती कोठुन कोठपर्यंत आहे व पांणद रस्त्यास कोणती वस्ती आहे, त्याचे नाव, त्यावर किती खर्च झाला त्याचे मजुराच्या मस्टरसह माहिती देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती चुकीची व पूर्ण दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी

माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना नमूद केलेले प्रयोजन विचारात घेता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोघमस्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ठ सफल होत नाहीत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. १९०१६ दिनांक : 30/12/2025